




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २१७ ■ शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







# पंतप्रधान कार्यालय आता सेवा तीर्थ !

## 75 वर्षांनंतर आज होणार स्थलांतर, 1200 कोटींची नवीन वास्तू



वृत्तसंस्था १३ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** गेल्या किमान साडेसात दशकांहून अधिक काळ देशाच्या पंतप्रधानांचे कार्यालय (पीएमओ) असलेल्या व सर्व महत्त्वाच्या सरकारी निर्णयांचे केंद्र असलेल्या एका अत्यंत महत्त्वाच्या सरकारी कार्यालयाचे आज, शुक्रवारी साउथ ब्लॉकच्या ब्रिटिशकालीन इमारतीतून नव्याने उभारलेल्या 'सेवा तीर्थ' येथे स्थलांतर होणार आहे. किमान १,२०० कोटी रुपये खर्च करून बांधलेले 'सेवा तीर्थ' हे दर्शवते, की प्रशासन म्हणजे केवळ स्थान बदलणे नव्हे, तर सत्तेचा वापर कसा केला जातो, हेही पुनर्परिभाषित करणे होय, असे विचार पंतप्रधानांनी मांडले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रायसिना हिलवरील या प्रतिष्ठित इमारतीपासून एक किलोमीटरहून कमी अंतरावरील नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्‌घाटन होईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री आणि अधिकारी साउथ ब्लॉकमधून सेवा तीर्थाकडे जातील. नव्या इमारतीत पंतप्रधान कार्यालय, कॅबिनेट सचिवालय, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार कार्यालय आणि इंडिया हाउस आहे. इंडिया हाउस हे आंतरदेशीय बैठका व उच्चस्तरीय शिष्टमंडळांच्या परिषदांचे आयोजन करण्याचे नवीन ठिकाण असणार आहे. पंतप्रधान कार्यालय साउथ ब्लॉक पूर्णपणे रिकामे केल्यानंतर, साउथ ब्लॉक आणि नॉर्थ ब्लॉक दोन संग्रहालयांत रूपांतरित केले जातील. पुढील काही आठवड्यांत संरक्षण आणि परराष्ट्र मंत्रालयांचे स्थलांतर साउथ ब्लॉकमधून अनेक स्वतंत्र कार्यालयांत केले जाईल. 'सेवा तीर्थ' हा केवळ पंतप्रधान कार्यालयाचा नवीन पत्ता नाही; याद्वारे एकाच संकुलात प्रशासनाची सर्वोच्च केंद्रे एकत्र येणार आहेत. 'क्रमांक एक'च्या सेवा तीर्थामध्ये पंतप्रधान कार्यालय, 'सेवा तीर्थ दोन'मध्ये कॅबिनेट सचिवालय आणि 'सेवा तीर्थ तीन'मध्ये राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय; तसेच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार कार्यालय आहे. जुन्या व्यवस्थेत, या संस्था वेगवेगळ्या ठिकाणांवरून काम करीत होत्या. यामुळे संवेदनशील बाबींवर समन्वयाचा अभाव असल्याचा वर्तमान सरकारचा दावा होता.

### पहिली अन् शेवटची मंत्रिमंडळ बैठक

भारताच्या स्वातंत्र्याची पहाट उजाडल्यावर पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली पहिली मंत्रिमंडळ बैठक याच साउथ ब्लॉकमध्ये झाली. सन १९३१ मध्ये रायसिना हिलवर असलेले साउथ ब्लॉक आणि नॉर्थ ब्लॉक यांचे बांधकाम पूर्ण झाले. पंतप्रधान कार्यालयाचा इतिहास १९४७ मध्ये स्थापन झालेल्या एका लहान पंतप्रधान सचिवालयापासून (पीएमएस) सुरू होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ रोजी साउथ ब्लॉकमध्ये होणाऱ्या अखेरच्या मंत्रिमंडळ बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील.

# टाटाच्या कंपनीला इंडोनेशियातून ७० हजार वाहनांची ऑर्डर!

वृत्तसंस्था १३ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** टाटा मोटर्सनं दिलेल्या माहितीनुसार, त्यांची पूर्ण मालकीची उपकंपनी 'पीटी टाटा मोटर्स डिस्ट्रीब्युशन इंडोनेशिया'नं इंडोनेशियामध्ये ७०,००० वाहनांच्या पुरवठ्यासाठी एका करारावर स्वाक्षरी केली आहे. या उपकंपनीसाठी ही आतापर्यंतची सर्वात मोठी ऑर्डर ठरली आहे. ही वाहनं प्रामुख्याने कृषी उपक्रम आणि ग्रामीण लॉजिस्टिकमध्ये वापरली जाणार असून, यामध्ये शेतमालाची बाजारपेठेपर्यंतची वाहतूक आणि देशभरातील मालवाहतुकीचा समावेश असेल.

# शेअर बाजारात 'ब्लॅक फ्रायडे' !

## 'एआय'मुळे आयटी सेक्टर धोक्यात

वृत्तसंस्था १३ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** भारतीय शेअर मार्केटमध्ये शुक्रवारी, आठवड्याच्या शेवटच्या व्यापार दिवशी, सलग दुसऱ्या दिवशी विक्रीचा लाल रंग वर्चस्व गाजवत आहे. आयटी शेअर्समध्ये जोरदार विक्रीमुळे बीएसई सेन्सेक्स ६५० अंकांपेक्षा जास्त घसरणीसह उघडला, तर निफ्टी५० निर्देशांक जवळजवळ २०० अंकांनी आपटला असून दिवस पुढे सरकत असताना ही घसरण आणखी खोलवर गेली.

### अमेरिकन बाजारात ९० लाख कोटी पाण्यात

दुसरीकडे, अमेरिकन बाजारही सलग दुसऱ्या दिवशी लालेलाल झाला, तर आशियाई बाजारालाही मंदीचा सामना करावा लागत आहे. नवीन एआय टूल्समुळे अनेक पारंपारिक व्यवसाय मॉडेल्सचे मोठे नुकसान होऊ शकते आणि कंपन्यांचा नफा कमी होण्याबाबत गुंतवणूकदारांमध्ये भीती दिसत आहे. एआयचा परिणाम ट्रकिंग, लॉजिस्टिक्स, रिअल इस्टेट आणि सॉफ्टवेअरशी संबंधित स्टॉकमध्ये सर्वात जास्त दिसून येत असल्यामुळे अमेरिकन मार्केटमधील घसरणीमुळे अंदाजे एक ट्रिलियन डॉलर्स किंवा ९० लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा केला आहे.

अमेरिकेपासून ते भारतीय शेअर बाजारापर्यंत सर्वत्र गोंधळ उडाला असून एआयबद्दलची चिंता आता जागतिक पातळीवर पोहोचल्यामुळे गुंतवणूकदारांनी धास्ती घेतली आहे. एआयमुळे बाजारात मोठी घसरण होत, विशेषत: आयटी कंपन्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागला आहे. शुक्रवारी भारतीय शेअर बाजारही उघडताच मोठ्या प्रमाणात घसरला.

# तुमच्या एका चुकीच्या एन्ट्रीने टायर होणार निकामी !

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोला:** शहरात टायर किलरचा थरार! चुकीच्या एन्ट्रीवर आता टायरची खैर नाही. नेहरू पार्क ते उड्डाणपूल रस्ता आता बंद; नियम मोडला तर टायर फाटणार. नो एन्ट्रीमध्ये वाहन नेल्यास टायर किलर टायरचे मोठे नुकसान करणार हे निश्चित.



अकोला शहरातील वाहतूक शिस्तबद्ध करण्यासाठी आणि 'रॉंग साईड'ने येणाऱ्या वाहनचालकांना चाप लावण्यासाठी प्रशासनाने आता कठोर पाऊल उचलले आहे. शहरातील प्रमुख उड्डाणपुलावर आता 'टायर किलर्स' बसवण्यात आले आहेत. जर तुम्ही नियम मोडून चुकीच्या दिशेने प्रवेश केला, तर तुमच्या गाडीचे टायर क्षणात फाडून टाकले जातील. यामुळे उड्डाणपुलावरचे ॲक्सिडेंट थांबतील. नेहरु पार्क चौकातून उड्डाणपुलावर आता जाता येणार नाही. प्रशासनाने उड्डाणपुलावरील वाहतूक आता 'वन-वे' केली आहे.

# तारिक रहमान नवे पंतप्रधान होण्याचे संकेत!



वृत्तसंस्था १३ फेब्रुवारी

**ढाका :** जुलै २०२४ मधील उठावानंतर बांगलादेशी जनतेने पहिल्यांदाच राष्ट्रीय निवडणुकीत मतदान केले. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने (बीएनपी) बहुमताचा १५० आकडा पार करताच विजयाची घोषणा केली. बांगलादेशमधील सर्वात मोठा इस्लामी पक्ष जमात-ए-इस्लामीला मागे टाकत बीएनपीने परिवर्तनाची नांदी केली. बीएनपीला ३०० पैकी २०१ जागा मिळाल्याची माहिती असून, जमातच्या वाट्याला ७२ जागा येण्याचा अंदाज आहे. शेख हसीनाच्या नेतृत्वाखालील अवामी लीग सरकार कोसळल्यानंतर मुहम्मद युनूस यांनी सत्ता हाती घेतली.

युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारचे सत्तापालट करत बीएनपीने कट्टर भारतविरोधी 'जमात' आणि त्याच्या मित्रपक्षांवर मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच अजिंक्य आघाडी घेतली होती. 'बांगलादेशचे नागरिक एका दशकाहून अधिक काळ या दिवसाच्या प्रतीक्षेत होते', अशी प्रतिक्रिया रेहमान यांनी दिली. 'उद्यापासून तुमचे लोकप्रतिनिधी तुमच्या सेवेत हजर असतील', असेही ते म्हणाले. तर, 'हा नव्या बांगलादेशाचा जन्मदिवस आहे.

### शेख हसीनाच्या हकालपट्टीनंतर दीड वर्षांनी निवडणूक

बांगलादेशात १३ व्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान पार पडले. तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत करण्यात आल्यानंतर दीड वर्षांनी ही निवडणूक झाली. संसदेच्या तीनशे जागांपैकी २९९ जागांवर हे मतदान झाले. एका मतदारसंघातील उमेदवाराच्या निधनामुळे तेथे मतदान घेण्यात आले नाही. बांगलादेशाच्या स्थानिक प्रमाणवेळेनुसार सकाळी साडेसात ते दुपारी साडेचार या कालावधीत मतदान आटोपल्यानंतर लगेचच मतमोजणीस सुरुवात झाली. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीला (बीएनपी) या निवडणुकीत जनमताचा कौल मिळेल, असा अंदाज निवडणूकपूर्व सर्वेक्षणात वर्तवण्यात आला होता.

# पंकज पवार वर धुळ्यात गुन्हा दाखल, अकोल्यात टाळाटाळ !

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

## अकोला तपासाचा अहवाल गुलदस्त्यात टाकला कोणी

**धुळे / अकोला:** धुळ्यातील जिल्हाधिकारी यांचे क्षेत्र दुरुस्तीचे आदेश प्राप्त नसतानाही, आपल्या अधिकारांचा गैरवापर करून ६८२ प्रकरणांत नियमबाह्य बदल केल्याप्रकरणी धुळ्याचे तत्कालीन भूमी अभिलेख उपअधीक्षक पंकज पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धुळे शहर पोलीस ठाण्यात जिल्हा अधीक्षक विजयकुमार सवडदकर यांनी यासंदर्भात फिर्याद दिली असून, या कारवाईमुळे भूमी अभिलेख विभागातील खळबळजनक गैरव्यवहार चव्हाट्यावर आला आहे.

पदाचा गैरवापर करत पंकज पवार यांनी धुळे येथे कार्यरत असताना, जून २०१६ ते जुलै २०२१ या कालावधीत धुळ्याचे तत्कालिन नगर भूमापन अधिकारी म्हणून काम करताना ही अनियमितता केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय ६८२ प्रकरणांत क्षेत्र दुरुस्ती केली. त्याच बरोबर ९२ प्रकरणांमध्ये 'ब-सत्ता' प्रकाराऐवजी 'अ-सत्ता' प्रकार स्वधिकारात दाखल केला.इतक्यावरच पंकज पवार थांबले नाहीत.

तर त्यांनी मिळकत पत्रकातील घोळ केला. २७ प्रकरणांमध्ये नवीन नगर भूमापन क्रमांक देऊन खोटी मिळकत पत्रिका तयार केली. अशा एकूण ८०१ मालमत्ता पत्रकांमध्ये अनियमितता करून शासनाची मोठी फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

### अकोल्यातील चौकशी अहवाल दाबला कोणी ?

धुळ्यातील घोटाळ्याच्या निलंबनानंतर पंकज पवार याची अकोल्यात बदली करण्यात आली. अकोल्यातही त्यांनी अनियमितता केली म्हणून त्यांचे पुन्हा निलंबन करण्यात आले. या निलंबन कारवाईनंतर अकोला भूमि अभिलेख कार्यालयात चौकशी समिती दाखल झाली. चौकशी समितीला अनेक प्रकरणात गैरप्रकार आढळला. तसा अहवाल तयार केला गेल्याची माहिती असून पण, हा अहवालच दाबण्यात आला आहे. हा अहवाल का दाबला गेला आणि या सर्व गैरप्रकारात पंकज पवार याच्या सोबत इतर ज्युनिअर अधिकारी व कर्मचारी यांचा देखील सहभाग असल्याचे उघड झाले. असे असताना केवळ पंकज पवार याच्यावर निलंबनाची कारवाई अकोल्यात केल्या गेली. इतरांना कोणी व का वाचविले असा प्रश्न निर्माण होत आहे.जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख व उपसंचालक यांनी अकोल्यात कारवाईस टाळाटाळ का केली याची चर्चा प्रशासकीय वर्तूळात रंगली आहे.

# चंद्रपूर प्रकरण तापले

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**चंद्रपूर :** चंद्रपूर महापालिकेत २७ नगरसेवक असलेल्या काँग्रेसचा गटबाजीने महापौरपदाच्या निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला. भाजपाने थेट उद्धवसेनेच्या पाठिंब्याने पालिकेवर पुन्हा वर्चस्व मिळविले. आता यावरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. यातच भाजपाला पाठिंबा देणाऱ्या चंद्रपूरमधील उद्धवसेनेच्या नगरसेवकांना मातोश्रीवर बोलावण्यात येणार असल्याचे म्हटले जात आहे.चंद्रपूरला घडले, त्याबद्दल उद्धव ठाकरे यांची भूमिका नाही. चंद्रपूरमध्ये ज्यांनी शेण खाल्ले त्यांच्यावर कारवाई होईल. चंद्रपूरमध्ये आमच्या पक्षाने स्थानिक पातळीवर निर्णय घेतला, ती आमची भूमिका नाही.

# चिमुकल्या स्वराची काय चूक ?

## आईने सोडलं अन् आजी-मामासोबतच निघेल स्वराची शेवटची यात्रा !







प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अडगाव (ता. तेल्हारा):** काळाचा घाला केव्हा आणि कसा येईल, याचा नेम नसतो. तेल्हारा तालुक्यातील अडगाव बुद्रुक येथे बुधवारी संध्याकाळी ७ च्या सुमारास नियतीने असाच एक क्रूर खेळ मांडला. एका भीषण आगीने केवळ घरच जाळले नाही, तर एका हसत्या-खेळत्या कुटुंबातील तीन पिढ्यांचे स्वप्न क्षणात राख करून टाकले. या आगीत सात वर्षांच्या चिमुकल्या स्वरा प्रभुदास सोळंकेचा झालेला मृत्यू संपूर्ण अकोला जिल्ह्याला चटका लावून गेला आहे.

भीषण आगीत स्वराची चूक काय होती ? तिची काहीच चुक नव्हती. चुक होती ते तिच्या आईची. तिच्या आईने पहिली फारकत घेत दूसरा घरोबा केला आणि स्वरा मात्र आजी-मामाकडे थांबली. अडगावच्या आठवडी बाजार परिसरात शेख इब्राहिम यांच्या घरात भाड्याने राहणाऱ्या आपल्या आजी (रत्ना उकर्डा चव्हाण, ५६) आणि मामा (अनिल उकर्डा चव्हाण, २४) यांच्याकडे स्वरा लाडाने राहायला आली होती. आईची माया काही काळासाठी बाजूला सारून ती आजीच्या कुशीत विसावली होती. पण त्याच घराच्या भिंतीत तिचा मृत्यू दबा धरून बसला असेल, याची पुसटशी कल्पनाही कुणाला नव्हती.

घरात मोठ्या प्रमाणात डिझेलचा साठा होता. आगीची एक ठिणगी पडली आणि त्या इंधनाने रौद्ररूप धारण केले. क्षणात होत्याचे नव्हते झाले. घराची राख रांगोळी झाली. सात वर्षांची स्वरा आणि तिचा तरुण मामा अनिल यांचा आगीच्या लोळात जागीच होरपळून मृत्यू झाला. तर आजी रत्नाबाई यांनी अकोल्याच्या रुग्णालयात उपचारादरम्यान प्राण सोडले. एकाच कुटुंबातील तीन जीवांचा असा अंत पाहून उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. आता घरात कुणीच नसल्याचे चित्र होते.

### डिझेलचा अवैध साठा होत असताना...

डिझेलचा कॅनमध्ये अवैध साठा गावाच्या मध्यवस्तीत होत असताना तपास यंत्रणा काय करत होती. मोठ्या कॅनमध्ये डिझेल साठवणूक करत त्याचे पुढे काय केले जायचे असा प्रश्न अनुत्तरीत आहे. अडगाव येथील सर्व समाजबांधवांनी आगीतील प्रत्येकाला वाचविण्यासाठी ज्या प्रकारे जीवाचे रान केले ते खरोखरच समाजाला एकतेचे दर्शन घडविणारे होते. पण, आगीतील तिघांना वाचविण्यात या सर्वांना अपयश आले पण, शेजारच्या इतर सर्वांना सुरक्षित वाचविले गेले.

### मामा-भाचीसह आईवर चंडिकापूर येथे अंत्यसंस्कार

अडगाव येथील भीषण आगीत मृत्युमुखी पडलेल्या मामा, भाची अन आई या तिघांवरही त्यांच्या मूळगाव असलेल्या अकोट तालुक्यातील चंडिकापूर येथे शोकाकुल वातावरणात शुक्रवार, १३ फेब्रुवारी संध्याकाळी अंत्यसंस्कार होणार होते. हे संपूर्ण कुटुंब मूळ चंडिकापूर येथील असून ते आठ-दहा वर्षांपासून तेल्हारा तालुक्यातील अडगाव बु. येथे राहण्यास आले होते.

गुरुवार रात्री स्थानिक नागरिकांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, अग्निशमन दलानेही आग आटोक्यात आणली, पण या अग्नितांडवाने स्वराचे निष्पाप बालपण कायमचे हिरावून घेतले. घरात डिझेल-पेट्रोलचा साठा नेमका कोणाचा होता आणि तो तिथे का ठेवला होता? या प्रश्नांचे उत्तर आता पोलीस शोधत आहेत. परंतु, या चौकशीतून काहीही निष्पन्न झाले तरी, आईने पाठ फिरविलेली आणि आजीत मायेची ऊब शोधायला गेलेली स्वरा आता कधीच परत येणार नाही, हेच विदारक सत्य अडगावकर आज पचवत आहेत.




सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# पेंशन समाधान उपक्रम, पेंशन अदालत उत्साहात

**अमरावती:** जिल्हा कोषागार कार्यालयातर्फे कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात आहरण व संवितरण अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी पेंशन समाधान उपक्रम आणि पेंशन अदालत उत्साहात पाडली. कोषागार अधिकारी अमोल इखे अध्यक्षस्थानी होते. महालेखापाल नागपूर यांचे कार्यालयातील वरीष्ठ लेखाधिकारी मैथीली जगनाथन, सहाययक लेखाधिकारी अनुपमा भटटाचार्य, लेखापाल सचिनकुमार, वरीष्ठ कोषागार अधिकारी शिल्पा पवार उपस्थित होते. महालेखापाल कार्यालयातील अधिकारी यांनी अचूक निवृत्ती वेतन प्रस्ताव कसे तयार करावेत, ज्यामुळे निवृत्ती वेतन व कुटुंबनिवृत्ती वेतनधारकांना वेळेवर लाभ प्रदान करण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी निवृत्तीवेतनविषयक प्रश्नांची तात्काळ सोडवणूक करुन देण्यात आली. तसेच शंकाचे समाधान करण्यात आले. उपस्थितांनी माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून निवृत्तीवेतन प्रदाने तात्काळ करण्यासाठी महालेखाकार कार्यालय, कोषागार कार्यालय आणि संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी एकत्रितपणे कार्य करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

# मेळघाटात नवीन वर्षात फेब्रुवारीतच उद्भवणार जलसंकट

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी



**धारणी:** मेळघाट हे नेहमीच काही गावकरीता फेब्रुवारी महिन्यात जलसंकट उद्भवत असताना पहायला मिळतात.या वर्षी पाऊस कमी पडल्याने जल जिवन मिशन अंतर्गत उभारण्यात आलेल्या विहिरी उन्हाळ्यात कोरड्या पडण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली असून येणाऱ्या काळात भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. 'हर घर नल से जल' या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत प्रत्येक घरात नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला असला, तरी पाण्याच्या स्त्रोतांची पातळी सातत्याने खालावत असल्यामुळे या योजनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अमरावती जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत मेळघाटातील सर्वच गावांमध्ये जलजीवन मिशन योजना राबवून 'हर घर नल से जल' अंतर्गत प्रत्येक घरात नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. मात्र, धारणी व चिखलदरा तालुक्यातील डोंगराळ भागात उन्हाळा सुरू होताच विहिरींची पाण्याची पातळी झपाट्?याने खोलवर जात असल्याचे दिसून येते.गावांना पोहोचणार पाणीटंचाईची झळ

विशेषतः धारणी व चिखलदरा तालुक्यातील अतिदुर्गम भागांतील भूत्रूम, बुटीदा,ऐकताई, हतरू, चिलाटी, राहु, बिबा, विबामल, कावडाझिरी, राणीगाव, खिडकी ,यांसारख्या अनेक गावांना यंदाच्या उन्हाळ्यात पाणीटंचाईची सर्वाधिक झळ बसण्याची शक्यता आहे. नागरिकांमध्ये तीव्र चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे यंदा नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागणार असल्याची भीती आतापासूनच व्यक्त केली जात आहे. मेळघाटातील नदीनाले दरवर्षी उन्हाळ्यात आटतात. परिणामी, जलजीवन मिशनच्या विहिरींमधील पाणीसाठा पूर्णतः संपुष्टात येण्याची परिस्थिती निर्माण होते. या विहिरींच्या पाण्याची पातळी वाढविण्यासाठी अद्याप कोणत्याही कायमस्वरूपी आणि प्रभावी उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या योजनेचे अस्तित्व केवळ पावसाळ्या पुरतेच मर्यादित राहते की काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दीर्घकालीन जलव्यवस्थापन धोरन ची नितांत गरज या भागातील भौगोलिक रचना देखील पाणीटंचाईला कारणीभूत ठरत आहे. डोंगरावर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही, कारण या परिसरात मुरमाड व खडकाळ जमिनीचे उपाययोजनांची मागणी विहिरीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी नदी-नाल्यांवर सिमेंट बंधारे (चेकडॅम) बांधणे, पाणी अडवून भूजल पुनर्भरण (रिचार्जिंग) करणे, कायमस्वरूपी जलसंधारण योजना राबवणे, विहीर पुनर्भरण,डोंगराळ भागात विशेष जलसंधारण प्रकल्प उभारणे अशा उपाययोजना तातडीने राबविण्याची जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# अमरावतीत तरुणाची निर्घृण हत्या

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

## नांदगाव पेठमध्ये थरार

**अमरावती :** शुल्लक कारणावरून अमरावती एका तरुणाची चाकूने सपासप वार करून हत्या करण्यात आल्याची घटना नांदगाव पेठ पोलीस हद्दीत घडली. गौरव सुधाकर घोटेकार (३४, रा. अंजनगाव सुर्जी) असे या घटनेतील मृताचे नाव आहे.

ही धक्कादायक घटना बुधवारी रात्री ८:४५ च्या सुमारास नांदगाव पेठ टोलनाक्याजवळील सर्व्हिस रोडवर घडली. या घटनेत गौरवचा भाऊ सौरभघोटेकार (३०) हादेखील जखमी झाला आहे. याप्रकरणी, नांदगाव पेठ पोलिसांनी सौरभच्या तक्रारीवरून तीनही आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविला तथा काही तासात तिघांनाही बेड्या ठोकल्या. तिघांनाही १५ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

अंजनगाव सुर्जी येथील मूळ रहिवासी असलेले सौरभ आणि गौरव हे नांदगाव पेठ येथील नमन विहार येथे राहात होते. बुधवारी रात्री दोन्ही भाऊ रेमंड कंपनीतील काम आटोपून जेवण करून दुचाकीने घरी परतत होते.

**अटक आरोपी व जप्त मुद्देमालांसह नांदगाव पेठचे ठाणेदार व पोलिस पथक.**

नांदगाव पेठ स्टॅण्डजवळील सव्हिस रोडवरील एका स्पीड ब्रेकरजवळ मागून आलेल्या ट्रिपल सीट दुचाकीने त्यांच्या गाडीला जोरात धडक दिली. धडक लागल्याचा जाब विचारला असता, आरोपींनी शिवीगाळ सुरू केली. हमको जानते नहीं क्या? हम महादेव खोरी के भाई लोग है, असे म्हणत आरोपींनी दहशत माजवण्याचा प्रयत्न केला.

**गौरवचे वाटेतच सोडले प्राण**

वादाचे रुपांतर हाणामारीत झाले आणि आरोपी आदेश तेलमोरे याने आपल्याजवळील धारदार चाकू काढून गौरवच्या दोन्ही पायांच्या मांडीवर खोलवर वार केले, गौरव रक्ताच्या थारोळ्यात कोसळला असतानाच, सौरभवाचवण्यासाठी धावला असता त्याच्यावरही हल्ला करण्यात आला. दोन्ही भावांवर हल्ला करून ते पसार झाले. उपचारासाठी दवाखान्यात नेत असताना गौरवचा वाटेतच मृत्यू झाला.

# जिजाऊ बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे राष्ट्रीय स्तरावरील १०० सहकारी बँकेच्या आयकॉनिक लीडर २०२६ संमेलनात सन्मानित

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी




**अमरावती :** राष्ट्रीय स्तरावरील अग्रगण्य १०० सहकारी बँकांच्या आयकॉनिक लीडर्स २०२६ संमेलन नुकतेच बँकेचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी उपाध्यक्ष व संचालक यांच्यासाठी खोपोली येथे आयोजित करण्यात आले होते. सदर संमेलनात को-ऑपरेटिव्ह बँकिंग करिता सायबर सेक्युरिटी वर्कशॉप तथा आयटी क्षेत्रातील नवीनतम तंत्रज्ञान या अनुषंगाने चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. परिषदेचे उद्घाटन रिझर्व बँक सेन्ट्रल बोर्ड संचालक सतिश मराठे यांच्या शुभहस्ते करण्यात येऊन त्यांनी सहकारी बँकांनी दर्जेदार ग्राहक सेवांसोबत डिजिटलायझेशन व आधुनिक सेवा तथा फायनान्शिअल इंक्लुजन चे महत्त्व विशद केले.याप्रसंगी मिलिंद काळे कॉसमॉस बँक बिओएम अध्यक्ष तथा नॅफकब गव्हर्नन्स इन को-ऑपरेटिव्ह बँक या विषयावर मनोगत व्यक्त केले. परिषदेमध्ये सायबर सेक्युरिटी गव्हर्नन्स आणि फ्रॉड प्रिव्हेन्शन मॅनेजमेंट, डिजिटल पेमेंट शिफ्ट फॉर कॉपरेटिंग बँकिंग ग्रोथ, सहकारी बँका आणि नियंत्रक समन्वयाने सहकारी बँकांची जडणघडण व भविष्य, कृत्रिम बुद्धिमत्ता एआय ईन सायबर सिक्युरिटी, ट्रेझरी एक्सलन्स इन आप्टीमाईझींग रिटर्न इत्यादी विषयांवर दोन दिवस चाललेल्या या परिषदेमध्ये देशभरातून आलेल्या विविध सहकारी बँकांचे१००कोटि पर्यंत टायर वन, १००० कोटीपर्यंत टायर२, १०हजार कोटीपर्यंत टायर३, १०हजार कोटीपेक्षा जास्त टायर ४, या चार विभागातील उत्कृष्ट को-ऑपरेटिव्ह बँकांची पारितोषिकासाठी निवड करण्यात आली.जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष इंजि.अविनाश कोठाळे व संचालक यांना अतिऊत्कृष्ट चेअरमन ईन फायनान्शिअल इंक्लुजन या पुरस्काराने गौरविण्यात आले. जिजाऊ बँकेचा प्रयत्न सामान्य लोकांना बँकिंग प्रणाली मध्ये आणने, कर्ज पुरवठा करणे, समाजामधे उद्योजगता वाढविणे हा सातत्याने राहिलेला असल्याने हा पुरस्कार जिजाऊ बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांचा आहे असे अविनाश कोठाळे अध्यक्ष जिजाऊ बँक यांनी प्रतिपादन केले तसेच बँकेच्या रौप्य महोत्सवी वर्षात हा पुरस्कार सभासद व ग्राहकांचा सन्मान असल्याचे कोठाळे म्हणाले.

तसेच बँकीग टेक प्रोजेक्ट आफ द इयर, आऊटस्टॅन्डींग युझ ऑफ क्लाऊड ईन्फ्रास्ट्रक्चर हा मानाचा पुरस्कार देऊन जिजाऊ बँकेचा याप्रसंगी गौरव करण्यात आला. याप्रसंगी रिझर्व बँकेच्या आयटी टीमने बँकेचे सायबर सेक्युरिटी अंकेक्षण केल्यानंतर महाराष्ट्रातील तू टायर बँकांमध्ये विविध १०२ सायबर सेक्युरिटी कंट्रोल लावणारी महाराष्ट्रातील अग्रगण्य पहिली बँक जिजाऊ बँक असल्याचे सायबर सेक्युरिटी तज्ञ निलेश वानखेडे यांनी सांगितले.

हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी बँकेचे अध्यक्ष ईजी.अविनाश कोठाळे, बँकेचे उपाध्यक्ष ईजी.प्रदीप चौधरी, तज्ञ संचालक सनदी लेखापाल विजय जाधव, संचालक अनिल बंड, संचालक अनिल टाले, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन वानखडे हे प्रामुख्याने हजर होते. या कार्यक्रमाचे पारितोषिक वितरण ऑल इंडिया बँक असोसिएशन मुंबई चे अध्यक्ष सीईओ गोपाल भगत, पुणे जिल्हा असोसिएशन तथा पुणे सहकारी बँकेचे अध्यक्ष सुभाष मोहीते, सायबर क्राईम महाराष्ट्राची पोलीस महासंचालक संजय शिंदे, अर्बन बँक असोसिएशनचे अध्यक्ष ब्रम्हेच्या सीईओ प्रसाद पाटील,नॅफकब नवी दिल्लीचे सीईओ विवेक गुप्ता,डॉ. सुधीर महाजन सीईओ अम्ब्रेला ऑर्गनायझेशन, नॅफकब संचालक सुनील देवरा ,तथा विविध पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या परिषदेमध्ये सहकार चळवळ अधिक मजबूत करण्यासाठी गुजरात, महाराष्ट्र, आंध्र , दिल्ली,कर्नाटक, इत्यादी अग्रगण्य बँकांच्या प्रतिनिधींनींचा सहभाग सहकारी बँकिंग क्षेत्र बळकट करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा असल्याची खात्री उपस्थितांनी दिली.

सहकारी बँकांच्या संचालकांची कारकीर्द दहा वर्ष ठेवण्याबाबतच्यातथा ३वर्ष कूलींग पीरेड आणि रिझर्व बँकेच्या धोरणावर सुद्धा याप्रसंगी एम एस कबड्डी बँकेचे एक्स सीई ओ, बिओएम अध्यक्ष कर्नाड व इत्यादी नामांकित सदस्यांच्यापॅनल मध्येचर्चा करण्यात आली.

या परीषदेत इंटेलेक्चुअल मीडियाचे जैद सिद्दिकी यांनी उपस्थितांचे आभार मानले. सहकारी बँकांमधे सामान्य लोकांचा विचार होत असल्यानेभविष्य उज्ज्वल असल्याचे याप्रसंगी त्यांनी सांगितले.

# एआयसीटीई–एडुस्किल्स इंटर्नशिपमध्ये पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचा देशात दुसरा क्रमांक

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी




**अमरावती:** मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, नॅशनल इंटर्नशिप पोर्टल आणि एडुस्किल्स यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या एआयसीटीई–एडुस्किल्स व्हर्च्युअल इंटर्नशिपच्या १४ व्या कोहार्ट (ऑक्टोबर २०२५ ते डिसेंबर २०२५) दरम्यान घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी , सादरीकरण तसेच मूल्यमापन व प्रमाणपत्रच्या राष्ट्रीय सर्वेक्षणात पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती यांनी भारतातील टॉप १० परफॉर्मिंग इंजिनअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या कामगिरीमुळे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीला व विद्यार्थ्यांच्या कौशल्याधारित शिक्षणाला राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. या अभियांत्रिकी प्रभागामध्ये सर्वोच्च स्थान प्राप्त करणारे महाराष्ट्रातील पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय एकमेव आहे. या यशामुळे अमरावती जिल्ह्याचे शैक्षणिक क्षेत्रात नाव उज्ज्वल झाले असून संस्थेच्या गुणवत्तेची आणखी एक राष्ट्रीय पातळीवर नोंद झाली आहे.

एआयसीटीई–एडुस्किल्स व्हर्च्युअल इंटर्नशिप उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, क्लाउड कम्प्युटिंग, मशीन लर्निंग, ब्लॉकचेन, रोबोटिक्स अशा अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये उद्योगाभिमुख प्रशिक्षण देण्यात आले. या कालावधीत विद्यार्थ्यांच्या सहभागाची संख्या, प्रोजेक्ट पूर्णत्वाचे प्रमाण, उद्योगतज्ज्ञांकडून मिळालेला अभिप्राय, नवोपक्रमशील प्रकल्प सादरीकरणे व एकूण कामगिरी या निकषांवर देशभरातील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले. या सर्व निकषांमध्ये पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्रातून प्रथम व भारतामधून द्वितीय स्थान पटकावले.

# जळालेल्या मृतदेहाचा उलगडा; सहा जणांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी



**अमरावती:** कॅनॉलमध्ये शहानूर मापडलेल्या 'त्या' जळालेल्या अखेर उलगडले आहे. तो मृतदेह शेख शाहरुख शेख रऊफ या तरुणाचा असून, पैशांच्या कटातुन झालेला अपमान सहन न झाल्याने आर्मीतील बाप-लेकाने अन्य काही जणांच्या मदतीने ही निघृण हत्या केल्याचे समोर आले.

पुराव्याची राख रांगोळी करणाऱ्या सहा आरोपींच्या मुसक्या आवळून अमरावती ग्रामीण पोलिसांनी काही तासांत या खुनाचा यशस्वी उलगडा केला आहे. बुधवारी सकाळी ही घटना उघड झाली होती.

**अशी लावली विल्हेवाट**

मृतदेह लपवण्यासाठी महाजन याने आपला नातेवाईक शुभम रॉय वाला अंजनगाव सुर्जी येथून बोलावले. शुभमने आपल्या हटिलवरील तीन कामगारांच्या मदतीने शाहरुखचा मृतदेह चारचाकी वाहनात टाकला आणि कॅनॉलवर नेऊन तो पेटवून दिला. पोलिसांनी टिकेश प्रशांत महाजन, प्रशांत हरिचंद्र महाजन, अली अजगर (सर्व रा. आजी), शुभम रॉय, हर्षित गीर आणि निखिल गौर (सर्व रा. अंजनगाव सुर्जी) यांना अटक केली आहे. या कारवाईत ५ लाख ५० हजार रुपयांची कार आणि मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

**अपमान, कट आणि थरकाप उडवणारी हत्या**

शाहरुख याने आरोपी प्रशांत महाजन याला पैशांच्या कारणावरून सर्वासमक्ष शिवी गाळ केली होती. हा अपमान महाजन याच्या जिव्हारी लागला. लागला. मुलगा टिंकेश याच्या मदतीने शाहरुख चा काटा काढाण्याचे ठरवले. आरोपी अली अजगर याने शाहरुखला मंगळवारी रात्री जुने पैसे देऊन व्यवहार मिटयू असे सांगून आधी गावाबाहेर बोलावले. तिथे आधीच टपून बसलेल्या टिकेश महाजन आणि आलीने शाहरुखाला गाठले आणि त्याना बेदम मारहाण करून संपवले.

# तुम्ही आणि तुमच्या सवयी

**मित्रांनो, इंग्रजी भाषेमध्ये एक प्रसिद्ध वाक्य आहे :** YOUR HABITS EITHER MAKE YOU OR BREAK YOU.. याचा अर्थ असा की तुमच्या सवयीमुळे तुम्ही आयुष्यात एकतर यशस्वी होता किंवा अयशस्वी. तुमचे वय ही अतिशय महत्वाची बाब आहे ज्यामध्ये तुम्ही कोणतीही गोष्ट लवकर शिकता. ह्यामध्ये तुम्हाला लागणाऱ्या सवयी सुद्धा संमिलीत आहेत. 'सवय' या शब्दाचा अर्थ आजकाल चुकीचा लावल्या जातो. एखादी गोष्ट आपल्याला जमत नसेल तर लगेच असे सांगतात की मला त्याची सवय नाही. खरे पाहता सवय ही शेती करण्यासारखी आहे. चांगल्या शेतीसाठी जशी चांगली जमीन, बी-बियाणे, पाणी तसेच मेहनतीची गरज आहे, अगदी तशीच तुम्हाला चांगल्या सवयीसाठी वेळ, तुमची इच्छा आणि चिकाटीची गरज आहे. प्रोत्साहन मिळाल्याने आपली सुरवात होते, अंतःप्रेरणेने आपण सुरु केलेली बाब सुरु राहते आणि सवयीमुळे तीच बाब करणे हे आपल्यासाठी सहज होऊन जाते. तुमच्या आयुष्यावर सकारात्मक तसेच नकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या या महत्वपूर्ण घटकाविषयी आता आपण जाणून घेऊ.

मित्रांनो, सवय ही एकतर तुमची अतिशय प्रामाणिक नोकर असते किंवा अतिशय खराब मालक. हे विधान त्रिकालाबाधित सत्य आहे. मला असे वाटते की प्रत्येकच व्यक्ती ही त्याला असलेल्या सवयींचा परिपाक असते. जशा तुमच्या सवयी अगदी तसेच तुम्ही असता. सवयी चांगल्या तर तुम्ही चांगले आणि सवयी वाईट तर तुम्ही काही चांगले असू शकत नाही तुम्हीसुद्धा वाईट किंवा सामान्य असता. तुम्ही स्वतःमध्ये शरीरप्रकृती, मनोरंजन, निर्णयक्षमता, वेगवान काम करणे आणि सतत शिकत राहणे अशा चांगल्या सवयी निर्माण करू शकलात तर तुम्ही आयुष्यामध्ये खात्रीने यशस्वी होऊ शकता. एकदा सवय लागली कि ती मोडणे विद्वानालाही कठीण जाते.

**सवयी कशा लागतात :-** आपल्या आई-वडीलांनी लहानपणापासून योग्य काळजी घेतली तर चांगल्या सवयी निश्चितच लागू शकतात. खरे बोलणे, प्रामाणिकपणा, शांतपणा, सद्सद्विवेक बुद्धीने वागणे अशा सवयी प्रयत्नांनी लागू शकतात. याविरुद्ध अप्रामाणिकपणा, बदमाशी, खोटे बोलणे, बेशिस्तपणा, भित्रेपणा, स्वार्थीपणा यासारख्या दुर्गुणांची सवय सुद्धा तसेच वर्तन वारंवार करून लागते. आज दूरदर्शन, मोबाईल, आपण वाचलेली पुस्तके, आपली मित्रमंडळी, आपण पाहत असलेले सिनेमे असे कितीतरी घटक आहेत कि ज्यांच्यामुळे आपल्याला चांगल्या किंवा वाईट सवयींचा परिपाक : जेंव्हा आपण एखादी कृती विचार न करता वारंवार करतो तेंव्हा आपला मेंदू ही बाब लक्षात ठेवतो आणि पुढल्या वेळी आपण जेंव्हा ती कृती करतो तेंव्हा आपला मेंदू अगदी नकळत आपल्याला त्याच पद्धतीने करायला लावतो. सायकल, मोटार-सायकल किंवा कार चालवणे हया अशाच प्रकारात मोडतात. हया कृती करताना आपल्याला विचार करावा लागत नाही. आपला मेंदू आपल्याकडून अगदी सहज त्या कृती करायची आपल्याला सवय लावतो. त्यामुळे त्याचा कश्या सवयींसाठी आणि कसा उपयोग करायचा हे तुम्हीच ठरवायचे आहे. याचाच फायदा घेऊन काही यशस्वी विद्यार्थी, उद्योजक, व्यावसायिक प्रयत्नपूर्वक स्वतःला चांगल्या सवयी लावून घेतात.

**चांगल्या सवयी लावण्याच्या पद्धती :-** अर्ल नाईटंगलचे असे म्हणणे आहे कि यशस्वी लोकांचे रहस्यच मुळी हे आहे कि ही मंडळी स्वतःला त्याच सवयी लावतात की जी कामे करण्याचा अयशस्वी लोकांना कंटाळा येतो. अयशस्वी लोकांना शिस्त, कणखरपणा, कामात झोकून देणे, उत्साहाने काम करणे आदि गोष्टी आवडतच नाहीत आणि यशस्वी लोकं नेमक्या हयाच सवयी स्वतःला लावून घेतात. चांगली सवयी लावून घेण्याचे नेमके काही नियम नाहीत परंतु काही महत्वपूर्ण बाबींची काळजी घेतल्यास चांगल्या सवयी लावून घ्यायला मदत मात्र निश्चित होऊ शकते.

१) बालपणापासून पालकांनी काळजी घेऊन मुलांमध्ये कठीण परिश्रम, प्रामाणिकपणा, नातेसंबंधांचे महत्व, अभ्यासाचे महत्व, कामाप्रती निष्ठा इत्यादी चांगल्या सवयींचे महत्व बिंबवले चांगल्या सवयी लागायला मदत होते.

२) अधून मधून वाईट कृती केल्यामुळे वाईट सवयी लागायला मदत होते. लहानपणी गम्मत म्हणून पत्ते खेळण्यामुळे मोठेपणी जुगार खेळायची सवय लागू शकते. वाईट सवयींचा मोह टाळण्यामुळे चांगल्या सवयी लागू शकतात.

३) मित्रानो, कोणतीही सवय बदलण्यासाठी, नवीन सवय लावण्यासाठी किंवा वाईट सवय थांबवण्यासाठी कोणत्याही दिवशी सुरवात करू शकता.

४) चांगल्या सवयी लावण्यासाठी आपल्या अर्धचेतन मनाचा ( सब्कॉनशियस माईंड ) उपयोग आपल्याला करता आला पाहिजे. जेंव्हा एखादी गोष्ट तुम्हाला मनापासून हवी असते आणि तुम्ही त्याचाच विचार करता, तेंव्हा तुमच्या अर्धचेतन मनात त्या गोष्टीची नोंद होते आणि ती गोष्ट तुम्हाला कशी मिळेल याची काळजी तेच घेत.

५) स्वयंसूचना ही एक अशी पद्धत आहे की ज्यामध्ये तुम्ही स्वतःला सतत सकारात्मक सूचना देत राहता आणि त्यामुळे तुमच्या विचार करण्याच्या पद्धतीमध्ये हळूहळू बदल होतो.

६) एक पद्धत तुम्हाला चांगल्या सवयी लावून घ्यायला मदत करू शकते. या पद्धतीचे वर्णन सुप्रसिद्ध लेखिका रोंडा बर्न यांच्या ङ्कद सिक्रेट ङ्क या पुस्तकात दिले आहे. यानुसार तुम्ही प्रथम तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा, त्यानंतर तुमचा विश्वास असलेल्या परमेश्वरला तुम्हाला हवी ती गोष्ट मनापासून मागा आणि शेवटी ती गोष्ट तुम्हाला मिळाली आहे असे चित्र मनामध्ये तयार करा आणि तसेच वागा. तुम्हाला ती गोष्ट अगदी निश्चित मिळतेच. हाच नियम तुम्ही तुम्हाला हव्या असणाऱ्या चांगल्या सवयींसाठी लावा आणि स्वतःला चांगल्या सवयी लावून घ्या.

**वाईट सवयींवर कशी मात कराल :-**

१) वाईट सवयी सोडण्यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे स्वयंशिस्त. आपल्या वाईट सवयी ते लोक सोडू शकत नाही ज्यांच्यापाशी स्वयंशिस्त नाही. स्वतःला आपल्या वर्तनाच्या बाबतीत शिस्त लावणे आवश्यक आहे.

२) आपल्या सगळ्या सवयी आपल्याला एकतर आनंद किंवा दुखः देतात. आता मिळणारा आनंद मोठा की नंतर होणारे दुखः मोठे हे आपल्याला ठरवायचे असते. सिगारेट पिण्याचा आनंद मोठा कि कॅन्सर झाल्याचे दुखः मोठे हे आपले आपल्याला ठरवता येत नसेल तर दुर्दैव आहे.

३) वाईट सवयींचा विचार सतत करून वाईट सवयी लागतात. तसेच नेहमी चांगल्या सवयींचा विचार केल्यास अर्धचेतन मन तुम्हाला चांगल्या सवयी लावून देण्याची काळजी घेते. अर्धचेतन मन हे दुधारी तलवार आहे. त्याला चांगले आणि वाईट यातील भेद काळात नाही. त्याला वारंवार जे सांगितले जाते त्याच गोष्टी तुम्हाला मिळवून देण्यासाठी ते तुम्हाला संपूर्ण ताकदीने मदत करते.

४) संमोहन ही अशीच महत्वपूर्ण कला आहे कि ज्यामुळे तुम्ही तुमच्या वाईट सवयी सोडू शकता. या प्रकारात तुम्हाला संमोहन शास्त्रात निष्णात व्यक्तीची मदत घेऊन तुमच्या वाईट सवयींवर मात करता येते.

५) वाईट सवय सोडण्यासाठीची एक वेगळी पद्धत म्हणजे त्या वाईट सवयीच्या ऐवजी एक दुसरी चांगली सवय लाऊन घेणे.

६) वाईट सवय सोडण्यासाठी एक अभिनव पद्धत म्हणजे आपल्या कुटुंबातील व्यक्तींची किंवा मित्रांची मदत घेणे. सगळ्या वाईट सवयी आपल्या आपणच जर सोडवू शकलो असतो तर आपल्याला वाईट सवयी लागल्याच कशाला असत्या. तुमचे आईवडील, नवरा, बायको, मुले किंवा मित्रांना विश्वासात घेऊन आपली वाईट सवय सोडायला मदत करायला सांगा.

७) वाईट सवय सोडण्याची आणखी एक उत्कृष्ठ पद्धत म्हणजे २४ तासांच्या क्लबची मेम्बरशिप घेणे ही आहे. या मध्ये तुम्ही तुमच्या मनाला सांगता कि ङ्कमी सिगारेट फक्त २४ तासांसाठी सोडत आहे ङ्क आणि त्यानंतर २४ तास सिगारेट प्यायची नाही. २४ तास संपले की मनाला परत सांगायचे कि ङ्कआता फक्त पुढचे २४ तास मी सिगारेट पिणार नाही ङ्क. अशा पद्धतीने जर तुम्ही काही दिवस काढले कि आपोआपच तुमचे वाईट सवयींवर नियंत्रण निर्माण होते.

मार्क ट्वेन सारखा विद्वान म्हणतो कि ङ्क सवय ही एवढी सोपी बाब नाही की तुम्हाला हवी तेंव्हा लावली आणि हवी तेंव्हा काढून टाकली. चांगल्या सवयी लावायला किंवा वाईट सवयी घालवण्यासाठी प्रचंड सातत्य आणि निर्धाराची गरज आहेङ्क, मित्रानो चांगल्या आणि वाईट दोन्ही सवयी वर दिलेल्या वेवेगळ्या क्लुप्त्या वापरून तुम्ही तुम्हाला हव्या तशा वापरू शकता. लेखाच्या सुरवातीला लिहिलेल्या ओळी शेवटी लिहून लेखाचा समारोप करतो : YOUR HABITS EITHER MAKE YOU OR BREAK YOU. चांगल्या सवयींसाठी तुमच्या प्रयत्नांना मनपूर्वक शुभेच्छा.



नितीन बक्षी
अकोला,
९३७०२६०४९१

# सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## अकोल्यात २० ते २४ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरीय 'सरस प्रदर्शन'

**अकोला:** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मार्फत महिला स्वयंसहाय्यता समूहांचे सबलीकरण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या उत्पादनांची विक्री वाढविणे तसेच समूहांच्या आर्थिक जीवनमानात वाढ करणे या उद्देशाने जिल्हास्तरीय 'सरस प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन दि. २० फेब्रुवारी ते दि. २४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत लाल बहादुर शास्त्री स्टेडियम, सुंदराबाई खंडेलवाल टॉवर चौक, रेल्वे स्टेशन रोड, अकोला येथे भरविण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय सरस प्रदर्शनासोबतच विभागीय व मिनी सरस प्रदर्शनांचाही समावेश असून या माध्यमातून महिला उद्योजकांना आपली उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळणार आहे, असे आवाहन उमेदचे जिल्हा अभियान संचालक यांनी केले आहे.

## बार्शीटाकळी नगरपंचायत रामभरोसे, पदाधिकारी कुंभकर्णी झोपेत

**बार्शीटाकळी:** निवडणुकीच्या काळात दिलेल्या आश्वासनांचा नगरसेवक, नगराध्यक्ष यांना विसर पडलेला दिसतो. लोकांना आश्वासन दिले होते की आम्ही निवडून आल्यानंतर बार्शीटाकळीतले रस्ते, नाल्या, पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून देऊ. पण आता कोणताही नगरसेवक आपल्या वार्डात जाऊन पाहणी करीत नाही.

बार्शीटाकळीची मेन लाईन मधील सर्व्हिस लाईन ब्लॉक झाली असून पूर्ण रस्त्यावर पाणी वाहत आहे. येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना घाण पाण्याचा सामना करावा लागत आहे. यामुळे इथे घाणीचे साम्राज्य पसरले असून याकडे कोणीही लक्ष देण्यास तयार नाही. या पाण्यामुळे लोकांना रोगराई होत आहे. गावातले पथदिवे दिवसा सुरू असून रात्री बंद असतात. याकडे नगराध्यक्षांचे लक्ष नाही. अद्याप कोणत्याही प्रकारचे इथे काम सुरू नाही. लोक पिण्याच्या पाण्यासाठी दारोदार भटकत आहेत. बार्शीटाकळी तालुका ठिकाण असून असे वाटते की आपण कोणत्या खेड्यामध्ये राहतो. अशी बार्शीटाकळीची दुरावस्था झाली आहे. या ठिकाणी वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे अशी नागरिकांची मागणी आहे.

## आदिवासी परिसरात तोतया डॉक्टरकडून उपचार

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**पातुरः** तालुक्यातील आदिवासी बहुल भागात तोतया डॉक्टर रुग्णांवर उपचार करीत असून या उपचारादरम्यान अनेक आदिवासी बांधवांना लुबाडण्याचा प्रयत्न होत आहे. याला आळा घालणे आवश्यक आहे.

तालुक्यातील बोडखा, चिंचखेड, माळ राजुरा, कोसगाव, दुधानी, गोंधळवाडी, सावरखेड या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज असून सर्व शेतकरी व मजूर वर्ग आहेत. या परिसरामध्ये सकाळी व सायंकाळी एक बोगस डॉक्टर गावात फिरून गावातील रुग्णावर कोणतीही पदवी नसताना फक्त कंपाउंडरचा अनुभव असल्याने रुग्णावर चुकीचा उपचार करून मोठ्या प्रमाणात पैसे उकळतो. गावात फिरून कुणी रुग्ण आहे का शोध घेऊन त्याच्यावर पोपटासारखा बोलून उपचार करतो. या गंभीर घटने कडे तालुका वैद्यकीय अधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष करत असून आदिवासी भागातील अनेक रुग्णांचे शोषण होत आहे. चुकीच्या उपचारामुळे अनेकांना व्यंग आल्याची चर्चा सुद्धा आहे. डॉक्टर अर्धांगवायू, कॅन्सर सारखे आजार १००ज्ञ् बरा करण्याच्या भूलथापा मारून रुग्णावर उपचार




करित आहे. या गंभीर घटनेची आदिवासी नेत्यांनी दखल घेतली असून अकोला जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पातुर तहसीलदार गटविकास अधिकारी या भामट्या तोतया डॉक्टर वर कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. अशी आहे शिक्षेची तरतूद बोगस व्यावसायिकांच्या मुसक्या आवळण्यासाठी शासनाने महाराष्ट्र अधिनियम १९६१ मधील कलम ३३ ३८ मध्ये सुधारणा केली आहे. अनधिकृतपणे वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्याच्या शिक्षेमध्ये वाढ करण्यात आली आहे. हे सर्व गुन्हे दखलपात्र अजामीनपात्र ठरवण्यात आले आहेत. १३ मार्च २००१ पासून हा नवीन कायदा अमलात आला आहे. सुधारित कायद्यात बोगस डॉक्टरांचा व्यवसाय करताना पहिल्यांदा आढळून आल्यास शिक्षा ही दोन वर्षांपेक्षा कमी नसून किमान तीन वर्षांपर्यंत करण्यात आली आहे.

## फ्रीडम इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी शिष्यवृत्तीस पात्र

वि. प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोट :** स्थानिक गजानन नगर येथील फ्रीडम इंग्लिश हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज, अकोट येथील विद्यार्थिनी अक्षरा अतुल नाथे ही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ (इयत्ता ८ वी) मध्ये यशस्वी ठरून शिष्यवृत्तीस पात्र ठरली आहे.




या उल्लेखनीय यशासाठी फ्रीडम बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष मनोज झाडे, शाळा समिती अध्यक्ष प्रवीण झाडे, संस्था सचिव निलेश झाडे, संचालिका अश्विनी झाडे, मुख्याध्यापिका अरुणा ताले, फ्रीडम ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या राखी वांगे, पर्यवेक्षक विजय रेवस्कार, विभाग प्रमुख निखिल अनोकार तसेच विषय शिक्षक शारदा चांदूरकर, सचिन वाघोडे, दीपिका मोहोड, धनंजय बेदरकर यांच्या मार्गदर्शनाचा तिला लाभ झाला.

अक्षरा हिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व फ्रीडम संस्थेतील सर्व शिक्षकवर्गाला दिले आहे. संस्थेच्या वतीने तिचा गौरव करून अभिनंदन करण्यात आले.

## श्री बागाजी विद्यालय रुईखेड येथे सीड बॉल कार्यशाळा

वि. प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोटः** रुईखेड येथील श्री बागाजी विद्यालयात सामाजिक वनीकरण विभाग, अकोट यांच्या सहकार्याने पर्यावरण जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी प्रदूषण विषयावर चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, प्रश्नमंजुषा तसेच सीड बॉल निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली. सीड बॉल कार्यशाळेत प्रभारी शिक्षक विशाल मांडवे यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना सीड बॉल तयार




करण्याची माहिती दिली. वनविभागाचे ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. यावेळी वनविभागाचे डी.जी. शेगोकार ,ज्योती गाडे , रुपाली मोहड मॅडम, शरीफभाई, तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक निनाद मानकर,किरण मानकर सर, अनिता मानकर मॅडम, मंजुषा साठे मॅडम, प्रतीक्षा सदार, विठ्ठल फाळके, गजानन घुगे, अविनाश सुकोशे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## अकोट नगरपरिषदेत आरोग्य विभागाचा आढावा; १५ फेब्रुवारीपर्यंत स्वच्छतेचा अल्टिमेटम

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोटः** नगरपरिषद आरोग्य विभागाच्या कामकाजाचा बुधवारी आढावा घेण्यात आला. आरोग्य सभापती मनीष कराळे यांच्या दालनात झालेल्या बैठकीत १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत स्वच्छता व्यवस्थेत ठोस सुधारणा करण्याचा अल्टिमेटम देण्यात आला.



आमदार प्रकाश भारसाकळे व नगराध्यक्षा माया धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीस उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोडे, पाणीपुरवठा सभापती अमोल पालेकर, मनोज चंदन यांची उपस्थिती होती. घंटागाडीमार्फत कचरा संकलन, सार्वजनिक ठिकाणांची साफसफाई, नाल्यांची स्वच्छता व फॉगिंग मोहिम यावर विशेष भर देण्यात आला.

आरोग्य विभागाने समन्वयाने काम करून ठोस कृती आराखडा राबवावा, अशा सूचना मनीष कराळे यांनी दिल्या. १५ फेब्रुवारीपर्यंत अपेक्षित सुधारणा न झाल्यास कडक भूमिका घेण्याचे संकेतही देण्यात आले. बैठकीस आरोग्य अधिकारी व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

## गोर्धा येथे १५ फेब्रुवारीला होणार शिवांजली जरांगे यांचे कीर्तन

♦ १८ ला शिवपुराण कथा समाप्ती महाप्रसाद वितरण

**हिवरखेडः** येथील नजीक येत असलेल्या ग्राम गोर्धा येथे आसरा माता मंदिराच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून भव्य शिवपुराण कथा आयोजित केली असून या कथेत प्रवचनकार, कीर्तनकार, बाल कीर्तनकार, महिला किर्तनकार सहभागी होत आहे. १५ रोजी शिवांजली जरांगे यांचे कीर्तन होईल. शिवपुराण ११ फेब्रुवारी पासून आरंभ करण्यात आले, तर यामध्ये हभप राणीताई दौंड, हभप प्रसाद महाराज काष्ट्रे, माऊली महाराज जहूरकर, शिवानंद महाराज हनुमान टेकडी, शिवांजली जरांगे (पाटील) ज्ञानेश्वर महाराज वाभळे यांचे कीर्तन. तर साध्वी सर्वेश्वरी दीदी ह्या शिवपुराण प्रवक्ते आहेत.

## '५१ मनाचे श्लोक' सामूहिक पठन सोहळा उत्साहात

**अकोला :** अँड. धनश्री देव स्मृती सेवा व निलेश देव मित्र मंडळ यांच्या संयुक्त संकल्पनेतून श्रीरामदास नवमीनिमित्त बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी 'समर्थ रामदास स्वामींचे ५१ मनाचे श्लोक' या सामूहिक पठनाचा भव्य आणि ऐतिहासिक उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. 'जागर भक्तिचा' या उपक्रमांतर्गत अकोला शहरातील २० शैक्षणिक संस्थांमधील सुमारे २५,००० विद्यार्थी एकाच वेळी श्लोक पठण करणार आहेत.

या उपक्रमात अकोला खंडेलवाल इंग्लिश प्रायमरी स्कूल, मोहरदेवी खंडेलवाल हायस्कूल, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, भिकमचंद खंडेलवाल हायस्कूल (गोडबोले प्लॉट), मॉं. रेणुका मराठी प्राथमिक शाळा, ज्ञानदर्पण इंग्लिश शाळा, अमृत कलश विद्यालय, भारत विद्यालय (प्राथमिक व माध्यमिक), विवेकानंद इंग्लिश हायस्कूल, बाल

## देऊळगाव येथील महाआरोग्य शिबिरात दोन हजार लोकांची तपासणी

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोटः** देऊळगाव येथे श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त म.रा.वि.मं. अभियंता सहकारी पतसंस्था अकोला व गजानन महाराज संस्थान तर्फे विधवा महिलांना शिलाई मशीन वाटप करण्यात आले. तसेच महाआरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर घेण्यात आले. यामध्ये दोन हजार लोकांनी आरोग्य तपासणी करून घेतली. तसेच ५७ महिला, पुरूष व युवकांनी रक्तदान केले. देऊळगाव येथील श्री संत गजानन महाराज मंदिरामध्ये दरवर्षी प्रकट दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात येतो. यावर्षीही या सोहळ्याच्या निमित्ताने विविध



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये यावर्षी विधवा महिलांना त्यांचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. प्रकटदिनी गावातून श्रींच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पालखीमध्ये देऊळगाव, कवठा, आसेगाव, वडाळी, वडगाव या गावातील दिंड्या सहभागी झाल्या होत्या. कीर्तनानंतर भाविकांनी दिवसभर महाप्रसादाचा लाभघेतला, शेकडो व्यक्तींनी महाआरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

## नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सव रविवारपासून साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोला :** मेळघाटातील ऐतिहासिक नरनाळा किल्ला, समृद्ध वनसंपदा आणि स्थानिक संस्कृती यांचे दर्शन घडवणारा नरनाळा महोत्सव १५ ते १७ फेब्रुवारीदरम्यान साजरा होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय व वनविभाग, अकोट वन्यजीव विभाग यांच्या सहकार्याने निसर्गप्रेमींसाठी नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात विविध यंत्रणांच्या सहकार्याने नियोजन व पूर्वतयारी करण्यात आली आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अँड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते १५ फेब्रुवारी रोजी दु. ४. ३० वा. महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे.

महोत्सवात निसर्ग पर्यटनावर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे तिन्ही दिवस सकाळी ६ ते सायंकाळी ६ दरम्यान ट्रेकिंग, जंगल सफारी, बोटिंग, नरनाळा किल्ला सफारी असे निसर्गपर्यटनाधारित कार्यक्रम होतील. दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता महिला व पुरूषांसाठी 'मॅरेथॉन- संवर्धनासाठी धाव' होणार आहे. त्यासाठी अकोट फॉरेस्ट डेपो ते श्री संत गजानन महाराज विहीर फाटा असे साधारणतः १२ किमी अंतर असेल. चित्रकला स्पर्धा दि. १६ फेब्रुवारीला सकाळी १० ते २ दरम्यान विहीर फाटा परिसरात होईल व याच दरम्यान शहानूर येथे पाक कला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. वन्यजीव छायाचित्रण स्पर्धाही आयोजिण्यात आली आहे. महोत्सवात तिन्ही दिवस सांस्कृतिक कार्यक्रम सायं. ५ ते रा. १० वा. दरम्यान होणार आहेत. ৳

## खुल्या भूखंडांवरील कचऱ्यावर नगरपरिषद 'ॲक्शन मोडवर'

वि. प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोट :** शहरातील अनेक खासगी मोकळ्या भूखंडांवर कचरा, गवत, काटेरी झुडुपे व झाडांच्या फांद्या साचल्याने डासोत्पत्ती, दुर्गंधी तसेच साप-विंचूंचा उपद्रव वाढत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आल्याने नगरपरिषद प्रशासन 'ॲक्शन मोड'वर आले आहे.

नगरपरिषदेकडून सर्व खुल्या प्लॉटधारकांना १७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आपल्या मालकीच्या भूखंडावरील कचरा व झुडुपे स्वतःच्या खर्चाने साफ करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निर्धारित मुदतीत साफसफाई न केल्यास नगरपरिषदेकडून स्वच्छता करून त्याचा खर्च संबंधितांकडून वसूल केला जाणार आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ व शासन निर्णयानुसार दररोज १५० रुपये 'स्पॉट फाइन' आकारण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

साफसफाईनंतर पुन्हा घाण आढळल्यासही दंडात्मक व पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आवश्यक असल्यास संबंधित मालमत्तेवर बोजा चढविण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

## ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. राजन देशपांडे यांना पितृशोक नानासाहेब देशपांडे यांचे वयाच्या 99 व्या वर्षी निधन

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी



**अकोलाः** येथील ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ अॅड. राजन देशपांडे यांचे वडील श्रीवल्लभ लक्ष्मणराव उपाख्य नानासाहेब देशपांडे यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९९ वर्षांचे होते. शतकाकडे वाटचाल करणाऱ्या नानासाहेबांच्या जाण्याने देशपांडे परिवाराचा आधारवड हरपला आहे. आज दुपारी उमरी येथील हिंदू स्मशानभूमीत शोकाकूल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. नानासाहेबांच्या पश्चात पुत्र, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच शहरातील विधी, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी देशपांडे यांच्या निवासस्थानी धाव घेऊन त्यांचे सांत्वन केले. अंत्यविधीला शहरातील ज्येष्ठ वकील, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लिपिक टंकलेखक (गट-क) पदासाठी ऑनलाईन परीक्षा १४ मार्च रोजी

**अकोलाः** सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक टंकलेखक (गट-क) या सरळसेवेतील पदासाठी अर्ज केलेल्या अकोला जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांना कळविण्यात येते की, टी.सी.एस.-आयओएन यांचेमार्फत ऑनलाईन परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा दि. १४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. संबंधित उमेदवारांनी वेळेत लॉगिन करून परीक्षा प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन मेजर आनंद शरद पाथरकर यांनी केले आहे.

## सेंट पॉल पब्लिक स्कूलच्या खेळाडूची आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी

प्रतिनिधी १३फेब्रुवारी

♦ २५ देशातील खेळाडूंचा सहभाग

**अकोटः** वॉको इंडिया किकबॉक्सिंग फेडरेशन, स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया तसेच जेके टायर प्रस्तुत यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित वाको इंडिया आंतरराष्ट्रीय किक बॉक्सिंग टूर्नामेंट कप २०२६ दि. ४ ते ८ फेब्रुवारी रोजी के.डी.जाधव इंनडोअर इंदिरा गांधी स्टेडियम,दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती , या स्पर्धेमध्ये भारतीय संघामध्ये अकोला जिल्ह्यातील चार खेळाडूंची निवड करण्यात आली होती तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून ९१ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता तसेच परराज्यातील व परप्रांतीय देश पॅलेस्टाईन, उझबेकिस्तान, इराक, इटली, कझाकिस्नान, स्विझर्लंड, नेपाळ, युरोप, या सोबतचं २५ देशातील खेळाडूंचा समावेश होता.





स्पर्धेत स्थानिक अकोट येथील सेंट पॉल्स पब्लिक स्कूलची खेळाडु कु.नेहा निखिल खोले हिची निवड करण्यात आली होती तिने १४ वर्षाआतील वयोगटात ःड४७ वजनगटात फायनल सामन्यात परराज्यातील खेळाडू सोबत लढत करुन रौप्य पदक प्राप्त केले ,या यशामागे शा.शिक्षक प्रशांत ठोकळ व अनंत पाचकवडे यांचे प्रशिक्षण व तांत्रिक मार्गदर्शन मोलाचे ठरले .

पदक वितरण प्रसंगी वाको इंडिया किकबॉक्सिंग फेडरेशन (इंडिया) अध्यक्ष संतोष अग्रवाल, किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन,महाराष्ट्र अध्यक्ष निलेश शेलार, सचिव धिरज वाघमारे यांनी खेळाडूंचे कौतुक केले तसेच विजय प्राप्त खेळाडूंना संस्था अध्यक्ष नवनीत लखोटिया, लुनकरन डागा, प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दिपम लखोटिया, प्रा. व्दारिका प्रसाद बसेर डॉ. कविता मिश्रा यांनी खेळाडूंचे कौतुक केले व पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.

## सातपुड्याच्या कुशीत 'लहान महादेव'ची दिव्य ओळख, भाविकांचा वाढता ओघ

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**सालबर्डी :** सातपुडा पर्वतरांगच्या निसर्गरम्य कुशीत वसलेले सालबर्डी हे ठिकाण धार्मिक आणि ऐतिहासिक वारसामुळे विशेष प्रसिद्ध होत आहे. येथे सुमारे ७०० वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या प्राचीन शिवगुफेत शिवलिंग असल्याची मान्यता आहे. या ठिकाणाला ङ्कलहान महादेवङ्क म्हणून ओळख मिळाली असून भाविकांमध्ये याबद्दल मोठी श्रद्धा आहे. डोंगराच्या खोलगट भागात असलेल्या या गुफेत नैसर्गिकरीत्या पाणी झिरपत राहते, त्यामुळे शिवलिंगावर सतत जलाभिषेक होत असल्याची भावना भक्तांमध्ये आहे. यामुळे अनेक श्रद्धाळू वर्षभर दर्शनासाठी येथे येतात. विशेषतः महाशिवरात्रीच्या काळात येथे मोठी यात्रा भरते आणि



हजारो भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. हे ठिकाण महाराष्ट्र व मध्यप्रदेश सीमेजवळ असल्यामुळे दोन्ही राज्यांतील भक्त येथे मोठ्या संख्येने येतात. धार्मिक श्रद्धेबरोबरच परिसरातील हिरवाई, डोंगररांगा आणि शांत वातावरण पर्यटकांनाही आकर्षित करते. स्थानिक प्रशासन व ग्रामस्थांच्या सहकार्याने येथे सोयी-सुविधा वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. रस्ते, पिण्याचे पाणी व इतर सुविधा सुधारल्यास धार्मिक पर्यटनाला आणखी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


| NAME CHANGE | FATHER NAME CHANGE | MOTHER NAME CHANGE |
| --- | --- | --- |
| PASSPORT NO R5383820 FILE NO NG1061509873817 | PASSPORT NO R5383820 FILE NO NG1061509873817 | PASSPORT NO R5383820 FILE NO NG1061509873817 |
| OLD NAME MOHAMMAD FAIZ | OLD NAME NAJMODDIN RANGARI | OLD NAME ALMAS TABASSUM |
| NEW NAME MOHAMMAD FAIZ NAJMUDDIN RANGARI | NEW NAME NAJMUDDIN SABUDDIN RANGARI | NEW NAME ALMAS TABASSUM NAKMUDDIN RANGARI |
| --:ADDRESS:- BADA MOMINPURA, ANKUMAN ROAD, BALAPUR, DIST: AKOLA MAHARASHTRA-444001 | --:ADDRESS:- BADA MOMINPURA, ANKUMAN ROAD, BALAPUR, DIST: AKOLA MAHARASHTRA-444001 | --:ADDRESS:- BADA MOMINPURA, ANKUMAN ROAD, BALAPUR, DIST: AKOLA MAHARASHTRA-444001 |

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

### बायोमेट्रिक तपासणी

■ भरती प्रक्रिया सुरू झाल्यापासून यवतमाळ पोलिस विभागाने खबरदारी घेतली आहे. प्रत्येक उमेदवारासाठी योग्यतेची तपासणी, शारीरिक चाचणी, कागदपत्रे आणि बायोमेट्रिक तपासणी यांसारख्या प्रक्रिया पारदर्शकपणे राबविल्या जात आहेत. यामुळे उमेदवारांच्या मनात कोणतेही संशय उभे राहू नये आणि प्रक्रिया अधिक विश्वासार्ह बनेल. भरती प्रक्रियेतील या उच्च तंत्रज्ञानाच्या वापर केला आहे.

### मार्चमध्ये लेखी परीक्षा

■ भरती प्रक्रियेतील शारीरिक चाचण्या पूर्ण झाल्यानंतर, उमेदवारांची लेखी परीक्षा मार्च महिन्यात होण्याची शक्यता आहे. लेखी परीक्षेसाठी दहा पटीने उमेदवारांना बोलावण्यात येईल. पोलीस शिपाई पदासाठी एकूण 12,093 अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यात 8,744 पुरुष आणि 2,500 महिला उमेदवारांचा समावेश आहे. यासोबतच, बँड्समन पदासाठी 1,687 अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यात 1,000 पुरुष आणि 687 खेळाडू/माजी सैनिकांचा समावेश आहे.

# पोलिस भरतीत RFID तंत्रज्ञानाचा वापर; संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, सिसिटीव्हीचा 'वॉच'






### CCTV चा वॉच्

■ भरती प्रक्रियेत पारदर्शकतेची अधिक चांगली अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी यवतमाळ पोलिस दलाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. उमेदवारांच्या चाचणीसाठी संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे CCTV कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली ठेवण्यात येत आहे, त्यामुळे प्रक्रिया पारदर्शकतेने पार पडली जाऊ शकते. कोणत्याही उमेदवाराची गैरसोय होणार नाही, हे सुनिश्चित करण्यासाठी पोलिस विभागाने विशेष काळजी घेतली आहे.

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्हा पोलीस दलात सन 2024-25 कालावधीसाठी पोलीस शिपाई आणि बँड्समन संवर्गातील भरती प्रक्रिया 11 फेब्रुवारी 2026 पासून सुरु झाली आहे. पळसवाडी पोलीस कवायत मैदानावर सुरू असलेल्या या भरती प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. विशेषत:, RFID (Radio Frequency Identification) तंत्रज्ञानाचा समावेश करून उमेदवारांची शारीरिक चाचणी पारदर्शकपणे घेतली जात आहे. अशी माहिती, जिल्हा पोलीस अधिक्षक कुमार चिंता यांनी दिली.

या पोलीस भरती दरम्यान उमेदवारांच्या पायावर RFID घड्याळ लावले जात आहे, जे त्यांच्या शारीरिक चाचणीची वेळ आणि परिणाम स्वयंचलितपणे नोंद करते. यामुळे चाचणीच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा गोंधळ आणि पक्षपातीपण टाळले जात आहेत. तसेच, संपूर्ण भरती प्रक्रिया व्हिडिओ चित्रीकरणाखाली पार पडत आहे, ज्यामुळे कोणत्याही वादाच्या प्रसंगात त्वरित तपासणी केली जाऊ शकते. यासोबतच, CCTV कॅमेऱ्यांची निगराणीही चालू असते, जेणेकरून प्रक्रिया पारदर्शक व सुरक्षितपणे पार पडू शकेल. यामुळे उमेदवारांची कोणतीही गैरसोय होणार नाही, असे पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्पष्ट केले.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने यवतमाळ पोलिस भरती प्रक्रियेची पारदर्शकता वाढली आहे. प्रत्येक उमेदवाराच्या शारीरिक चाचणीच्या वेळेची स्वयंचलित नोंद RFID तंत्रज्ञानाद्वारे केली जात आहे, ज्यामुळे चाचणी प्रक्रिया अधिक सुरळीत आणि पारदर्शक झाली आहे. प्रत्येक उमेदवाराच्या पायावर एक RFID घड्याळ लावले जाते, आणि त्याची वेळ त्या उमेदवाराने किती वेळात चाचणी पूर्ण केली हे सांगते. यामुळे या प्रक्रिया अधिक विश्वासार्ह आणि तपासण्यास सुलभ झाल्या आहेत. यवतमाळ पोलीस विभागाने याव्यतिरिक्त प्रत्येक उमेदवारासाठी बायोमेट्रिक यंत्रणा, उंची आणि छाती मोजमाप यांचा वापर करून योग्यतेचे मापदंड तपासले आहेत. उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी वेगवेगळ्या कक्षांचे आयोजन करण्यात आले आहे, जेणेकरून प्रत्येक उमेदवाराच्या कागदपत्रांची तपासणी बिनधास्तपणे केली जाऊ शकते.

### शारीरिक चाचणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पहिल्या दिवशी 750 उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी बोलावण्यात आले होते, त्यापैकी 565 उमेदवार उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी 1000 उमेदवारांना बोलावण्यात आले होते, त्यापैकी 846 उमेदवार उपस्थित होते. आज तिसऱ्या दिवशी 1500 उमेदवारांना बोलावण्यात आले होते, त्यापैकी 1250 उमेदवार उपस्थित झाले.



# आंतरजिल्हा ड्रग्स तस्कराला अटक

### ९.८२ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या अवैध तस्करीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेला मोठे यश मिळाले असून शिरपूर पोलिसांनी आंतरजिल्हा ड्रग्स तस्कराला अटक केली आहे. आरोपीकडून ५७.१ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) सह एकूण ९ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात पोलिस स्टेशन स्तरावर आतापर्यंतची ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे सांगण्यात आले.

श्रेयश उर्फ गुड्डू शशिकांत पाटील (वय २४) रा. पुनवट ता. वणी असे आरोपीचे नाव आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार ड्रग्सविरोधी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत ११ फेब्रुवारी २०२६ रोजी शिरपूर पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पुनवट (ता. वणी) येथील व सध्या नागपूर येथे वास्तव्यास असलेला श्रेयश उर्फ गुड्डू शशिकांत पाटील (वय २४) हा वणी-शिरपूर परिसरात एमडीची विक्री करत असल्याची माहिती मिळाली.

तो वणीकडे जाणार असल्याचे समजताच पोलिसांनी चारगाव-वणी मार्गावर नाकाबंदी करून सापळा रचला. सायंकाळी पाचच्या सुमारास चारगावकडून वणीकडे जाणारी एमएच ३२ एएच ४१२६ क्रमांकाची सिल्वर रंगाची डॅटसन गो प्लस ही चारचाकी अडविण्यात आली.

झडतीदरम्यान आरोपीकडून ५७.१ ग्रॅम मेफेड्रोन (अंदाजे किंमत ५ लाख ६० हजार रुपये), ड्रग्स मोजण्यासाठी वापरण्यात येणारे तीन डिजिटल वजन काटे (१५ हजार रुपये), एक मोबाईल फोन (७० हजार रुपये) तसेच तस्करीसाठी वापरलेली चारचाकी (४ लाख रुपये) असा एकूण ९ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीला अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या कालावधीत तस्करीच्या साखळीचा सखोल तपास करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. अंमली पदार्थांच्या विक्री किंवा सेवनाबाबत माहिती असल्यास नागरिकांनी शिरपूर पोलिसांशी संपर्क साधावा, अशी विनंती करण्यात आली असून माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार संतोष मनवर, धिरज गुल्हाणे, सुरज साबळे, ईक्बाल शेख, प्रशांत झोड, पंकज कुडमेथे, परमेश्वर दराडे, किरण दासरवार, सुनील दुबे यांनी केली.



# बंजारा आरक्षणासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत

### मंत्री संजय राठोड यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**यवतमाळ :** बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासाठी आयोग अथवा समिती नेमावी, या मागणीला अखेर यश आले आहे. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, याबाबतचा शासन निर्णय लवकरच निर्गमित होणार असल्याची माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

या निर्णयामागे मंत्री राठोड यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे स्पष्ट झाले आहे.



मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र बंजारा आरक्षण कृती समितीच्या सदस्यांनी मुंबई येथे मंत्री राठोड यांची भेट घेऊन आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली होती. गेल्या चार महिन्यांपासून हा विषय शासन पातळीवर सातत्याने मांडला जात होता. संबंधित विभागांशी समन्वय साधत मंत्री राठोड यांनी यासाठी सातत्याने प्रयत्न केले. समाजाच्या मागणीबाबत शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले होते. त्याच दिवशी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री राठोड यांनी हा विषय पुन्हा उपस्थित केला. मागणीनुसार निवृत्त उच्च न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यामुळे बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला अधिकृत प्रक्रियेत गती मिळाली आहे.

यानंतर मंत्री राठोड यांनी आरक्षण कृती समितीच्या सदस्यांसोबत सविस्तर चर्चा केली. समितीसमोर ऐतिहासिक, सामाजिक आणि कायदेशीर आधारासह अभ्यासपूर्ण व तथ्याधारित मांडणी करण्याचे आवाहन त्यांनी केले. ठोस पुरावे सादर झाल्यास निर्णय प्रक्रियेला बळ मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या निर्णयाबद्दल महाराष्ट्र बंजारा आरक्षण कृती समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मंत्री संजय राठोड यांचे आभार मानले. समाजाच्या मागणीला शासन पातळीवर प्राधान्य देत सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यामुळेच हे यश मिळाल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे.

# 'जय सेवालाल'च्या जयघोषात उमरखेड सज्ज!

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**उमरखेड :** क्रांतिकारी सेवालाल महाराज यांच्या २८७ व्या जयंतीनिमित्त उमरखेड शहरात भव्य जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. "जय गोर, चालो उमरखेड"च्या घोषणांनी संपूर्ण तालुका दुमदुमणार असून सोमवार, दि १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता भव्य शोभायात्रा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

हरीत क्रांतीचे प्रणेते स्व. वसंतरावजी नाईक चौक येथून शोभायात्रेला प्रारंभ होणार असून महागांव रोडवरील खुले नाट्यगृह येथे कार्यक्रम पार पडणार आहे. या शोभायात्रेत विविध भजनी मंडळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संत सेवालाल महाराज उत्सव समितीचे अध्यक्ष प्रकाश राठोड व उपाध्यक्ष संतोष जाधव यांनी केले आहे. या जयंती महोत्सवाच्या उद्घाटनासाठी राज्याचे राज्यमंत्री तथा गोंदिया जिल्हा पालकमंत्री ना. इंद्रनिल नाईक यांच्यासह नगराध्यक्षा सौ. मोहिनीताई नाईक, आ. किसनराव वानखेडे, माजी आ. उत्तमराव इंगळे, माजी आ. प्रकाश पाटील देवसरकर, माजी आ. विजयराव खडसे, माजी आ. नामदेव ससाने, नगराध्यक्षा तेजश्री जैन, भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, नगरसेविका ज्योत्सना प्रतिक रुडे साहेबराव कांबळे, चितांगराव कदम, गोपाल अग्रवाल यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री यवतमाळ जिल्हा मा. ना. संजयभाऊ राठोड राहणार असून माजी जि.प. अध्यक्ष रमेश चव्हाण ,प्रा कैलास राठोड , रविकांत रुडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यापूर्वी १५ फेब्रुवारीला सायंकाळी ६ वाजता माहेश्वरी खुले नाट्यगृह येथे मुलामुलींचे सांस्कृतिक कार्यक्रम व नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ३ ते १५ वयोगटातील स्पर्धकांसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली असून प्रथम बक्षीस ११ हजार रुपये, द्वितीय ९ हजार रुपये, तृतीय ३ हजार रुपये, चतुर्थ ५ हजार रुपये व पाचवे बक्षीस ३ हजार रुपये असे रोख पारितोषिक ठेवण्यात आले आहे. नोंदणीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वसंतराव नाईक प्रतिष्ठाण, गोरसेना, बंजारा डॉक्टर असोसिएशन व समस्त बंजारा बांधव उमरखेड तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने हा भव्य जयंती महोत्सव आयोजित करण्यात येत असून शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. 'जय सेवालाल'च्या जयघोषात उमरखेडमध्ये ऐतिहासिक जयंती सोहळा साजरा होणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

# उमरखेड येथे शिवजयंतीनिमित्त कार्यक्रम

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**उमरखेड :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सार्वजनिक शिवजयंती महोत्सव उमरखेड येथे १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात विविध समाजप्रबोधनात्मक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

१५ फेब्रुवारी रोजी एमपीएस अकॅडमी येथे विद्यार्थ्यांसाठी शिवसामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १७ फेब्रुवारी रोजी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मैदानात भव्य 'किल्ले बनवा' स्पर्धा होणार आहे.

१८ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता जिजाऊ ब्रिगेड व सर्व महिला संघटनांच्या वतीने दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे. रात्री ७ वाजता अहमदनगर येथील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांचे 'जगण्यातल्या आनंदाच्या वाटा' या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.




१९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन होईल. सकाळी ९ वाजता उत्तरवार रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करण्यात येईल. सकाळी ११ वाजता मोटारसायकल रॅली काढण्यात येणार असून दुपारी १२ वाजता शहरातून लेझीम, झांकी आदी विविध देखाव्यांसह भव्य शोभायात्रा निघणार आहे. सायंकाळी ६ वाजता बक्षीस वितरण समारंभ होईल. त्यानंतर दिल्ली येथील सुप्रसिद्ध राजकीय विश्लेषक तथा वरिष्ठ पत्रकार अशोक वानखडे यांचे 'छत्रपती शिवाजी महाराज यांची राजनीती व आजचे वास्तव' या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष गजानन देशमुख, कार्याध्यक्ष डॉ. संजय तेला, कोषाध्यक्ष वसंतराव देशमुख, उपाध्यक्ष रमेश चव्हाण, सचिव ॲड. सतीश मुटकुळे तसेच सिद्धेश्वर जगताप, गुलाब सूर्यवंशी, भय्या पवार, प्रकाश शिंदे, गजानन जगताप, प्रवीण गादेकर आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# बेवारस रेती साठ्यावर कारवाई; तस्करांचे धाबे दणाणले

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**कळंब :** तालुक्यातील डोंगर खर्डा–मेठीखेडा मार्गावर शासकीय आश्रम शाळा, अंतरगाव परिसरात सिमेंट रस्त्यालगत बेवारस स्थितीत रेतीचा साठा आढळून आल्याने महसूल प्रशासनाने तातडीने कारवाई केली. या कारवाईमुळे परिसरातील रेती तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

अंतरगाव साज्याचे तलाठी श्री. काळे हे नियमित कर्तव्यावर जात असताना त्यांना संबंधित ठिकाणी रेतीचा साठा दिसून आला. चौकशीअंती त्या साठ्यावर कोणीही मालकी हक्क सांगण्यासाठी पुढे न आल्याने त्यांनी याबाबतची माहिती मेठीखेडा अप्पर तहसीलदार कार्यालयाचे नायब तहसीलदार अनिल राजगुरे यांना कळविली.



माहिती मिळताच नायब तहसीलदार राजगुरे, तलाठी राजहंस आदी अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. सकाळी अकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास पंचनामा करून सदर रेती जप्त करण्यात आली.

वरिष्ठांच्या आदेशानुसार जप्त करण्यात आलेली रेती अंतरगाव येथील घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी एक ब्रास प्रमाणे वितरित करण्यात आली. यामध्ये जानराव किसन पंधरे, चंद्रकांत लक्ष्मण कुंमरे, राधाबाई किसन कोकांडे, अलका उद्धव पंधरे व जावेद अब्दुल रशीद शेख यांचा समावेश आहे. या कारवाईचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून घरकुल लाभार्थ्यांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत. महसूल विभागाच्या या धडक कारवाईमुळे डोंगरखर्डा–मेटीखेडा परिसरातील अवैध रेती वाहतूक व साठेबाजीवर आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# बोलेरो पिकअपसह चार गोवंश जप्त; मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**उमरखेड :** ढाणकी रोड बायपास पुलासमोर पोलिसांनी नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअपमधून चार गोवंश जनावरे अमानुष अवस्थेत वाहतूक करताना पकडली. या कारवाईत वाहनासह सुमारे ५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चालक-मालकाविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




देवराव गोमाजी मुरमुरे (वय ३६, रा. पिरंजी) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, बोलेरो पिकअप (क्र. MH26 AD 9164) मधून गोवंश जनावरे कोंबून, कोणतीही चारा-पाण्याची सोय न करता बाळदी रोडमार्गे उमरखेडकडे आणली जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस पथकाने ढाणकी रोड बायपास येथे नाकाबंदी केली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये दोन काळ्या व दोन पांढऱ्या रंगाची अशी चार गोवंश जनावरे दाटीवाटीने, आखूड दोरीने बांधून वाहतूक करताना आढळली. जनावरांना हालचालीसाठी पुरेशी जागा नसल्याने तसेच चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने त्यांना वेदना व दुखापत होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. जप्त जनावरांची अंदाजे किंमत ५० हजार रुपये असून बोलेरो पिकअपची किंमत सुमारे ४ लाख ५० हजार रुपये आहे. एकूण ५ लाख रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. सदर गोवंश जनावरे कत्तलीसाठी नेली जात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. जप्त जनावरांची पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात आली असून त्यांना उमरखेड येथील राजस्थानी सेवा समितीच्या गौशाळेत सुरक्षित ठेवण्यात आले आहे. ही कारवाई फौजदार सागर इंगळे व जमादार संघशील टेंभारे यांनी केली. आरोपीविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.




# पोकरा घोटाळा, भ्रष्टाचारातून माया केली गोळा...

# गैरप्रकाराची झाली हद्द,

# मंजूर झालेली विहीर केली रद्द!

## शेलुखडसे येथील अन्यायग्रस्त शेतकऱ्याची तक्रार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात खळबळ उडवून देणारे रिसोड तालुक्यातील शेलुखडसे पोकरा प्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे. शेतकऱ्यांच्या अडानीपणाचा फायदा घेत सबंधित कृषीसहाय्यक व कृषीअधिकारी यांनी स्वतःसाठी आर्थिकमाया मिळावी म्हणून पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्र लाभार्थ्यांना नियमबाह्य विहिरीचा लाभ दिला असल्याचे स्पष्ट होत आहे. याबाबत येथील शेतकरी रवि अर्जुन खडसे यांनी पुराव्यासहित, राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मा. दत्तात्रय भरणे व प्रशासनातील वरिष्ठ स्तरावर तक्रार दाखल केली आहे.

रवी खडसे यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, त्यांची नेर शिवारात स्वतःच्या मालकीची जमीन असून सदर शेतात पोकरा योजनेतून विहीर मिळावी म्हणून सर्वातआधी प्रस्ताव दाखल केला होता. दि. ३० जानेवारी २०२० मध्ये दाखल केलेल्या माझ्या अर्जाचा ऑनलाईन संकेतांक ५३१३६०/३.३.४/९५१७ हा आहे.





या अर्जानुसार मला रितसर विहिरीसाठी पूर्वसंमती सुद्धा मिळाली होती. मात्र लगेचच दुसऱ्या दिवशी माशी कुठे शिंकली काय माहीत ? मला कळविण्यात आले की, तुम्ही याआधी पोकरा योजनेतील एका घटकाचा लाभ घेतला आहे. त्यामुळे तुम्हाला दुसरा लाभ घेता येणार नाही. म्हणून तुमची विहीर रद्द करण्यात आली आहे. याबाबत मी अधिक विचारपूस केली असता, मला कृषीसहाय्यक शिंदे, खाडे, भिसडे आणि राऊतकर यांच्या कडून वेगवेगळी कारणे सांगण्यात आली होती. त्यामध्ये पाहिले सांगण्यात आले की तुमच्या अर्जात चूक झाली असून ती मुंबईवरून दुरुस्त करून आणावी लागेल. दुसरे कारण तुम्ही तुषार संचाचा लाभ घेतला आहे. त्यामुळे या योजनेतून एका लाभार्थ्याला कुठल्याही एका घटकाचा लाभ घेतला तर दुसरा लाभ घेता येत नाही. आणि सरतेशेवटी सांगितले की, तुमचे नेर शिवार या योजनेत समाविष्ट नाही. अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन कृषी विभागातील सर्वांनीच माझी दिशाभूल करून माझ्यावर खुप मोठा अन्याय केला आहे. मला विहिरीच्या लाभापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवून माझ्या भविष्यातील स्वप्नांचा चुराडा केला आहे. आणि याला सर्वस्वी जबाबदार कृषीसहाय्यक व कृषीअधिकारी हेच आहेत. कारण नेर शिवार जर पोकरा योजनेत समाविष्ट नाही तर ईतर लाभार्थ्यांना याच शेतशिवारात विहिरीसहीत अनेक लाभ देण्यात आले आहेत. शिवाय मला जे घटक माझ्या ऐपतीबाहेर असल्याने नको होते, त्या घटकांची मला पूर्वसंमती देण्यात आली होती. मग विहीरच का रद्द केली? अशी माझी तक्रार आहे. कारण माझ्या नंतर खुप उशिराने आलेले विहिरीचे प्रस्ताव मंजूर करून त्यांना लाभ देण्यात आला आहे. तर काहींना अपात्र असून देखील नियमबाह्य विहीर घटकाचा लाभ देण्यात आला आहे. मग माझ्यावरच अन्याय का ? हीच माझी गंभीर तक्रार आहे. या गंभीर गैरप्रकरणात आर्थिक देवाण घेवाण करून कुठे तरी पाणी मुरले असल्याचे स्पष्ट होत आहे. या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी माझी मागणी आहे. त्यासाठी आपण राज्याचे कृषीमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.दत्तात्रय भरणे साहेब, विभागीय कृषी सहसंचालक अमरावती आणि जिल्हाधिकारी साहेब वाशिम यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. पहिलेच संपूर्ण जिल्ह्यात गाजत असलेल्या शेलुखडसे येथील पोकरा योजनेतील या गैरप्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून चौकशी सुरू आहे. त्यात माझ्या तक्रारीची दखल घेऊन पुन्हा विहीर या घटकाची सर्व मुद्दे तपासून सखोल चौकशी व्हावी व भ्रष्ट कर्मचारी आणि ईतर दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

## थोडक्यात

### उद्या कारंजात 'रागांजली'तून लता दीदींच्या सुरांना मानवंदना



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

स्वर, साधना आणि संवेदनशीलतेचा अद्भूत मिलाफ अनुभवण्याची संधी कारंजा येथील संगीत प्रेमींना लवकरच लाभणार आहे. भारतरत्न, स्वरकोकिळा लता मंगेशकर यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त उषःकाल बहुउद्देशीय शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने 'रागांजली' या विशेष शास्त्रीय संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे.ही मैफल शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडे ६ वाजता कारंजा येथील शेतकरी निवास येथे रंगणार आहे.स्वरकोकिळा लतादीदींच्या आवाजाने संपूर्ण देशाच्या मनावर अधिराज्य गाजवले.त्यांच्या गीतांनी प्रेम, भक्ती, विरह, आशा आणि राष्ट्रभावना अशा प्रत्येक भावनेला स्वर दिला.याच अमर सुरांना अभिवादन करण्यासाठी 'रागांजली' या कार्यक्रमाची संकल्पना साकारण्यात आली आहे.

या मैफिलीत लतादीदींच्या रागाधारित, शास्त्रीय अंगाने बांधलेल्या अजरामर गीतांचे सादरीकरण करण्यात येणार असून, रसिकांना शुद्ध संगीताचा अविस्मरणीय अनुभव मिळणार आहे.या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे संगीततज्ज्ञ व सुप्रसिद्ध गायक प्रा.डॉ. स्नेहाशिष दास यांचे विशेष गायन असणार आहे.शास्त्रीय संगीतावर प्रभुत्व असलेले प्रा.डॉ.दास आपल्या सादरीकरणातून लतादीदींच्या गीतांमधील राग, भाव आणि गहिराई रसिकांसमोर उलगडणार आहेत. कार्यक्रमाची रंगत वाढवणार आहे.विशेष म्हणजे 'रागांजली' ही केवळ संगीत मैफल नसून ती सामाजिक बांधिलकी जपणारा कार्यक्रम आहे.अडचणींमुळे दुर्लक्षित राहिलेल्या गायक व संगीत कलाकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.संस्थेच्या अध्यक्षा अर्चना प्रकाशसिंह तोमर यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले की, लतादीदींच्या स्मृतींना अभिवादन करत संगीताच्या माध्यमातून समाजातील कलाकारांना आधार देणे, हाच या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश आहे.संगीतप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक उपक्रमाला सहकार्य करावे.असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा अर्चना प्रकाशसिंह तोमर यांनी केले आहे.

### श्री बिरबलनाथ महाराज यात्रा महोत्सवानिमित्त वृद्धांना ब्लॅकेट वाटप




● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगळनाथ येथील श्री संत बिरबलनाथ महाराज संस्थांच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. तसेच शहरा लागत असलेले चित्रऋषी महाराज वृद्धाश्रम वरुड (बु.) तुळजापूर, मूकबधिर व अपंग निवासी विद्यालय तुळजापूरयेथे संत श्री बिरबलनाथ महाराज संस्थान मंगरूळनाथ च्या वतीने दिव्यांग विद्यार्थी व वृद्धाश्रमातील निवासी ज्येष्ठ नागरिकांना ब्लॅंकेट चे वाटप करण्यात आले याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सचिव अविष रघुवंशी, उत्तमरावजी गावंडे वरुड बु., सुनील म्हातारमारे पोलीस स्टेशन मंगरूळनाथ, विद्यालयाचे प्राचार्य अभिजीत बी राठोड विद्यालयातील सर्व कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे शेवटी रघुवंशी यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ व चॉकलेटचे वाटप केले.

## दिव्यांग प्रमाणपत्रांचा घोटाळा, पैसा केला गोळा!

### बोगस-बनावट कार्डांची चौकशी करून तात्काळ रद्द करा -ॲड.संघनायक मोरे

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम जिल्ह्यात दिव्यांग प्रमाणपत्रांचा मोठा गैरव्यवहार सुरू असून बोगस, बनावट व चुकीची प्रमाणपत्रे सर्रास दिली जात असल्याचा गंभीर आरोप ॲड. संघनायक मोरे यांनी केला आहे. जिल्हा प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून हे प्रमाणपत्र देत असल्यामुळे खऱ्या दिव्यांग व्यक्तींवर अन्याय होत असल्याचे त्यांनी सांगितले.






आधार कार्ड एका व्यक्तीचे व नाव दुसऱ्याचे लावून दिव्यांग प्रमाणपत्र दिले जात असल्याचे प्रकार उघडकीस आले असून, त्यामुळे खऱ्या लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. हा लाभ अपात्र व्यक्तींना जात असल्याने दिव्यांगांच्या हक्कांवर घाला घातला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या गंभीर प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून सर्व बोगस, खोटे व चुकीचे दिव्यांग प्रमाणपत्र रद्द करण्यात यावीत, अशी ठाम मागणी करणारे निवेदन दिव्यांग विभागाचे सचिव तुकाराम मुंडे यांना ई-मेलद्वारे पाठवण्यात आले आहे.

तसेच या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, वाशिम यांनाही देण्यात आली आहे.प्रशासनाने त्वरित चौकशी समिती स्थापन करून दोषींवर कठोर कारवाई न केल्यास हा विषय अधिक तीव्रपणे लावून धरला जाईल, असा इशाराही ॲड. संघनायक मोरे यांनी दिला आहे.

### दिव्यांग प्रमाणपत्रासाठी खोटे 'पात्र', खरे 'अपात्र'! | खऱ्यांवर अन्याय

दिव्यांग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी खोटी पात्रता दाखवून खरे अपात्र लाभार्थी बनत असल्याचा धक्कादायक प्रकार वाशिम जिल्ह्यात समोर येत आहे. बनावट व चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे काही व्यक्तींनी स्वतःला दिव्यांग म्हणून दाखवून शासकीय योजनांचा लाभ घेतल्याने खरे दिव्यांग नागरिक वंचित राहिले आहेत.सूत्रांच्या माहितीनुसार, खोटी वैद्यकीय कागदपत्रे, चुकीची तपासणी, आधार व नावातील तफावत अशा मार्गांनी दिव्यांग प्रमाणपत्रे मिळवली जात आहेत. या गैरप्रकारामुळे दिव्यांगांसाठी असलेले आरक्षण, नोकरी, अनुदान व सवलती अपात्रांच्या पदरात पडत असून सामाजिक न्याय व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.या प्रकाराकडे प्रशासनाने वेळेत लक्ष न दिल्याने खोटे पात्र पुढे, खरे पात्र मागे अशी स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी खरे दिव्यांग लाभार्थी वर्षानुवर्षे प्रतीक्षेत राहूनही हक्काच्या सुविधांपासून वंचित राहतात.या पार्श्वभूमीवर संपूर्ण जिल्ह्यात दिलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रांची सखोल चौकशी व पुनर्तपासणी, बोगस प्रमाणपत्रे तात्काळ रद्द, तसेच दोषी लाभार्थी व संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी होत आहे.

## मूकबधिर व अपंग निवासी विद्यालयात ब्लॅंकेट वाटप




● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

शहरालगत असलेले चित्रऋषी महाराज वृद्धाश्रम वरुड (बु.) तुळजापूर, मूकबधिर व अपंग निवासी विद्यालय येथे दि. १२ फेब्रुवारी रोजी संत श्री बिरबलनाथ महाराज संस्थानच्या वतीने दिव्यांग विद्यार्थी व वृद्धाश्रमातील निवासी ज्येष्ठ नागरिकांना ब्लॅंकेट चे वाटप करण्यात आले आहे

संत बिरबलनाथ महाराज संस्थांचे अध्यक्ष, सचिव अविश कुमार रघुवंशी यांच्या शुभहस्ते दिव्यांग विद्यार्थी व वृद्ध आश्रमातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करून संस्थानच्यावतीने ब्लॅंकेट चे वाटप करण्यात आले, यावेळी उत्तमराव गावंडे वरुड बु., पो. कॉ. सुनील म्हातारमारे, विद्यालयाचे प्राचार्य अभिजीत बी राठोड इत्यादी मान्यवर उपस्थित होते, या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## तांत्रिक कामगाराचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावू - आरोग्य मंत्री

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

राज्यातील वीज उद्योग क्षेत्रात अहोरात्र कार्यरत असलेल्या तांत्रिक कामगारांच्या हक्क, सुरक्षितता आणि सामाजिक न्यायासाठी कटिबद्ध असलेल्या तांत्रिक कामगार युनियन (नोंदणी क्र. ५०५९) चे दुसरे राज्यव्यापी द्विवार्षिक महाअधिवेशन रविवारी (दि. ८ फेब्रुवारी २०२६) श्रीक्षेत्र आळंदी येथे ऐतिहासिक उत्साहात पार पडले. 'नवी दिशा, नवा विचार' या संकल्पनेवर आधारित या अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी ऑनलाइन पद्धतीने केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युनियनचे केंद्रीय अध्यक्ष दिलीप कोरडे होते. पिंपरी-चिंचवडचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी खेडचे आमदार बाबाजीसेठ काळे, महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, महानिर्मितीचे पुरुषोत्तम वारजुरकर, महावितरणचे जनसंपर्क अधिकारी विकास आढे, आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांसह संघटनेचे कार्याध्यक्ष शिवाजी शिवनेचारी, उपाध्यक्ष बी आर पवार, गोपाल गाडगे, सतिश भुजबळ, सरचिटणीस प्रभाकर लहाने, उपसरचिटणीस आनंद जगताप, विलास डवर, विलास निमसटकर, केंद्रीय संघटक महेश हिवराळे, आर.आर. ठाकुर, अरूण यावले, मनोज मोरे, श्रीराम वाकचौरे, राज्य सचिव रघुनाथ लाड, प्रकाश निकम, संजय उगले, बाळासाहेब काटे, कोषाध्यक्ष गजाननन अघम, मुख्य कार्यालय प्रतिनीधी दत्तु भोईर, महिला प्रतिनिधी शुभांगी मुचंडे, प्रसिध्दी प्रमुख अनिल सरोदे, तांत्रिक टाईम्स संपादक नितीन चव्हाण, विवेक बोरकर, विक्की कावळे, प्रदिप पाटील, प्रकाश वाघ, किरण कन्हाळे आदी सह अनेक मान्यवर उपस्थित होते. या महाअधिवेशनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो कामगार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरचिटणीस प्रभाकर लहाने यांनी केले, सूत्रसंचालन विश्वास आरडे व चंद्रशेखर बधे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रकाश निकम यांनी केले.

### श्री. संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवासाठी सज्ज व्हा...

## उणिवांची पूर्तता करा - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

**पोहरादेवी येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव २०२६ हा जिल्ह्याच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव करणारा व पर्यटन विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम असून, त्याच्या नियोजन व अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये, किरकोळ उणिवांची पुर्तता करावी असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव २०२६ च्या नियोजनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी पोहरादेवी येथे कार्यक्रमाच्या अनुषंगाने आढावा घेतला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, कारंजा उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, नगरपालिका प्रशासन सह आयुक्त



डॉ.बाबुराव बिक्कड, पर्यटन विभागाचे उपसंचालक विजय जाधव, महावितरणचे कार्यकारी अभियंता जीवन चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्राम जगताप आदींची प्रमुख उपस्थिती होती. काही यंत्रणा प्रमुखांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग नोंदविला.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले की, महोत्सवाच्या कालावधीत भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती अपेक्षित आहे. त्यामुळे सुरक्षा, वाहतूक, आरोग्य सेवा व आपत्कालीन व्यवस्थापन या सर्व बाबींमध्ये कोणतीही कमतरता राहू नये. सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय राखून नियोजनबद्ध व जबाबदारीने काम करावे.

महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, गर्दी नियंत्रणासाठी योग्य उपाययोजना करणे, वाहतूक सुरळीत राहील यासाठी पर्यायी मार्ग निश्चित करणे तसेच वाहनतळ व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. आरोग्य विभागाने वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका व प्राथमिक उपचार केंद्रांची उपलब्धता सुनिश्चित करावी, तर सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यक्रमस्थळ व संपर्क रस्त्यांवरील कामे वेळेत तात्काळ पूर्ण करावीत, असेही निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, पर्यायी मार्ग, वाहनतळ व वाहतूक नियोजन यासंदर्भातील सर्व बाबींचा मास्टर प्लान व मॅप व्दारे सखोल पाहणी करून त्यानुसार अंमलबजावणीचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. 'भाविकांना सुरक्षित, सुव्यवस्थित व सुसह्य वातावरण उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे,' असे प्रतिपादनही त्यांनी यावेळी केले.या अनुषंगाने कार्यक्रम स्थळांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सूचनाही दिल्या.

## उद्या विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महा-मेळावा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●




राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता वाटाणे लॉन, अकोला रोड, वाशिम येथे विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महा-मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या महाशिबिरास मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमात नागरिकांना मोफत विधी सेवा, वैकल्पिक वाद निवारण, मनोधैर्य योजना, पीडितांना नुकसान भरपाई योजना आदी योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत सर्व शासकीय विभागांच्या सहभागातून विविध शासकीय योजनांची माहिती, आधार कार्ड, पॅन कार्ड, आरोग्य कार्ड काढण्यासाठी सुविधा, वैद्यकीय तपासणी तसेच पात्र लाभार्थ्यांना योजनांचा थेट लाभ देण्यात येणार आहे. यासाठी सर्व विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स उपलब्ध असणार आहेत. या विधी सेवा महाशिबिराचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वाशिमचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हाधिकारी वाशिम आणि जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# कामगार संघटनांचा देशव्यापी संप

## बसस्थानक ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत काढला मोर्चा

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी




**अकोला:** कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी देशपातळीवर कार्यरत कामगार संघटनांनी पुकारलेल्या १२ फेब्रुवारीच्या देशव्यापी संपात अकोला जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी बसस्थानक चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत भव्य मोर्चा काढण्यात आला. प्रलंबित मागण्या सोडवण्याचा आग्रह धरला

या संपामध्ये सीटू अंतर्गत महाराष्ट्र सेल्स अँड मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हस असोसिएशन, आशा वर्कर्स व गटप्रवर्तक संघटना, महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन, महाराष्ट्र आरोग्य मित्र कर्मचारी संघटना आदींचा समावेश होता. कामगारांच्या प्रमुख मागण्यांमध्ये आठव्या वेतन आयोगात कामगार संघटनांच्या सूचनांनुसार बदल करणे, नवीन पेन्शन योजना रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करणे, कोरोना काळात रोखून ठेवलेला अठरा महिन्यांचा महागाई भत्ता तातडीने देणे, सर्व शासकीय विभागातील रिक्त पदे भरणे व ठेकेदारी पद्धत बंद करणे, चारही कामगार संहिता रद्द करणे आदी मागण्या समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या बरोबर संघटित, असंघटित व कृषी क्षेत्रातील मजुरांना किमान ९ हजार रुपये पेन्शन देण्यात यावी, समान कामाला समान वेतन लागू करा अशा मागण्याही करण्यात आल्या. केंद्रीय कामगार मंत्री तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

# डिजे वाजवण्यावर बंधने नाहीत का शहरात नियमांचे सर्रास उल्लंघन



प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोला:** एकीकडे उत्सव काळात डिजे वाजवण्यावर बंदी घालण्यात आली होती. परंतु शहर तसेच जिल्ह्यात डिजे नियमबाह्यपणे वाजवले जात आहेत. ठराविक डेसिबल तसेच वेळेची मर्यादा पाळली जात नाही. रूग्ण, वृद्ध, लहान मुले यांच्यासाठी डिजेचा मर्यादा ओलांडलेला आवाज जीवघेणा ठरत आहे. पोलिस विभाग अशांविरूद्ध कारवाई करणार का. तसेच या संदर्भात कठोर पावले उचलली जावी असे नागरिकांचे म्हणणे आहे.

सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत ५० डेसिबल ध्वनी मर्यादेची परवानगी शासनाने दिली आहे. परंतु डिजे चालकांकडून हे बंधन पाळले जात नाही. वरातीत वाजवले जाणारे डिजे त्या भागातील नागरिकांसाठी अग्निपरीक्षा ठरत आहेत. रूग्णालये, शाळा तसेच निवासी भागात डिजेचा वापर करताना काळजी घ्यावी परंतु तसे होत नाही. काल जुन्या शहरात अगर वेस भागात एका वृद्धाला डिजेच्या आवाजामुळे अस्वस्थ वाटू लागले. त्या भागातील लोकांनी त्यांना पाणी दिले. काही वेळाने त्यांना बरे वाटले. धडाकेबाज आवाजामुळे घराला हादरे बसतात. खिडक्यांची तावदाने फुटतात. हद्दवाढ भागात तर रात्री उशिरापर्यंत डिजे वाजत राहतात आणि लोक त्रास सहन करतात. याला त्वरित आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने संबंधितांवर कारवाई करावी. तसेच नागरिकांची त्रासातून सुटका करावी अशी मागणी आहे.

# पोलिस भरती ; दुसऱ्या दिवशी 670 उमेदवार पात्र !

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी



**अकोला** : सन २०२४-२०२५ मधील १६१ पोलिस शिपाई पदांच्या भरती प्रक्रियेला ११ फेब्रुवारीपासून पोलिस मुख्यालयात सुरुवात झाली आहे. १२ फेब्रुवारी रोजी १२०० उमेदवारांना बोलावण्यात आले होते. त्यापैकी ९८१ उमेदवार उपस्थित राहिले. यातील ९२३ उमेदवारांनी शारीरिक चाचणी दिली असून, त्यांना २५ पेक्षा अधिक गुण मिळवून ६७० उमेदवार पात्र ठरले आहेत.

भरती प्रक्रियेत शारीरिक मोजमाप, मैदानी चाचणी व कागदपत्र तपासणी यांचा समावेश असन ही प्रक्रिया महाराष्ट्र पोलिस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ नुसार सुरळीत, पारदर्शक व सुरक्षित पद्धतीने राबविण्यात येत आहे. उमेदवारांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय सेवा, रुग्णवाहिका, मोबाइल टॉयलेट, पी.ए. सिस्टीम आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भरती प्रक्रियेदरम्यान गैरप्रकार टाळण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी तैनात ठेवण्यात आले असून, आवश्यकतेनुसार अंगझडती घेतली जाणार आहे. तसेच उत्तेजक द्रव्ये सेवन केल्याचे आढळल्यास वैद्यकीय तपासणीनंतर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. उमेदवारांनी आधार कार्ड, पासपोर्ट साइज फोटो, शैक्षणिक कागदपत्रे, अधिवास, जात व नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रे (लागू असल्यास), ईडब्ल्यूएस/एसईबीसी प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक कागदपत्रे मूळ व दोन झेरॉक्स प्रतींसह सोबत ठेवणे आवश्यक आहे. सर्व प्रमाणपत्रे ७ डिसेंबर २०२५ पूर्वीची असणे आवश्यक आहे.

# डाव्या पक्षाने जाळला अमेरिकेचा कापूस

**खामगाव :** देशातील प्रमुख कामगार संघटना व शेतकरी संघटने कडून १२ फेब्रुवारी रोजी पुकारण्यात आलेल्या भारत बंदला खामगाव येथे अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. तसेच यावेळी भारतीय किसान सभे कडून भारत सरकारकडून अमेरिकाकडून आयात केलेला कापूस, सोयाबीन मका यांची होळी करण्यात आली. तसेच विविध मागण्यांचे निवेदन एसडीओंच्या मार्फत राष्ट्रपतींना दिले.

# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मागण्यांसाठी असहकार आंदोलन

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोला** : राज्यातील भूमी अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने असहकार आंदोलनाची घोषणा करण्यात आली असून, अकोला येथील प्रतिनिधींनी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख भारती खंडेलवाल यांना निवेदन सादर केले.

भूकरमापक पदासाठी अभियांत्रिकी पदविका अथवा पदवी आवश्यक असतानाही तांत्रिक स्वरूपाची कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना लिपिकवर्गीय वेतन दिले जात असल्याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. वन विभाग, तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेतील समकक्ष कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतनश्रेणी लागू असल्याचे संघटनेने नमूद केले. 'मॅट'ने कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल दिला असतानाही शासनाने त्याची अंमलबजावणी केलेली नसल्याचे सांगण्यात आले. या मागण्यांसाठी टप्प्याटप्प्याने काळ्या फिती लावून, तसेच मोजणी साहित्य जमा करण्यात येणार असून, मोजणी काम बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच सामूहिक रजा व पुणे येथे 'आक्रोश मोर्चा' काढण्यात येणार असून, मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संप पुकारला जाईल, अशी माहिती दीपाली एम. मुरकुटे यांनी निवेदनातून दिली. यावेळी विदर्भ लँड रेकॉर्ड स्टाफ असोसिएशनच्या सरचिटणीस तथा राज्य कृती समिती समन्वयक दीपाली मुरकुटे यांच्यासह विभागीय व जिल्हास्तरीय पदाधिकारी कुणाल राजपूत, अनंता पुंडकर, विशाल चराटे, श्रीकांत काळे, तुषार देशमुख, गजेंद्र चव्हाण, राजेश काळे, विवेक भराक्षे, सचिन कोलते व संजय चव्हाण उपस्थित होते.

# जुन्या आरटीओ ऑफिसजवळील गौतम नगरमध्ये घराला आग

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोला:** जुन्या आरटीओ ऑफिसजवळील गौतम नगर भागात शॉर्ट सर्किटमुळे एका घराला भीषण आग लागली. या आगीत अरुण गायकवाड नावाचे वृद्ध गृहस्थ किरकोळ भाजले असून घटनेच्या वेळी ते घरातच होते. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, या घरात अचानक शॉर्ट सर्किट झाले आणि पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केले. आगीच्या वेळी घरातील वृद्ध अरुण गायकवाड हे आतच अडकले होते, ज्यात ते होरपळले. स्थानिक तरुणांनी प्रसंगावधान राखत त्यांना बाहेर काढले.

परिसरातील नागरिकांनी तातडीने या घटनेची माहिती अकोला महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी आग विझवण्याचे काम सुरू केले. स्थानिकांच्या मदतीने घरात अडकलेल्या वृद्धाला सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. सुदैवाने, या घटनेत कोणतीही मोठी जीवितहानी झाली नाही, मात्र परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

प्राथमिक तपासानुसार, आग लागण्याचे मुख्य कारण शॉर्ट सर्किट असल्याचे समोर आले आहे. गायकवाड कुटुंब अत्यंत गरीब असून आगीमुळे त्यांच्या घराचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच घरातील वृद्ध व्यक्तीही जखमी झाली आहे. हे पाहता, संबंधित विभागाने गायकवाड कुटुंबाला आर्थिक मदत किंवा नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांच्या नातेवाईकांकडून केली जात आहे.

# चारित्र्याच्या संशयातून पत्नीची हत्या; पतीला जन्मठेप

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**अकोला:** चारित्र्यावर संशय घेऊन अपंग पत्नीला दगडी खलबत्त्याने ठार मारणाऱ्या पतीला जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

जिल्हा व सत्र न्यायाधीश राहुल शिंदे यांच्या न्यायालयाने आरोपी मनोहर भिका मेटांगे रा. माळेगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा याला भादंवि कलम ३०२ अंतर्गत दोषी ठरवत जन्मठेप व ५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने सक्तमजुरी अशी शिक्षा ठोठावली आहे.

१० मे २०२० रोजी पहाटे ३ वाजताच्या सुमारास आरोपीने पत्नी जिजाबाई मनोहर मेटांगे हिच्या चारित्र्यावर संशय घेत वाद घातला. संतापाच्या भरात स्वयंपाकघरातील चुलीजवळ ठेवलेल्या दगडी खलबत्त्याने तिच्या डोक्यावर वार करत तिचा खून केला. विशेष म्हणजे मृतक जिजाबाई या दोन्ही पायांनी अपंग होत्या.

संजय देवकर यांनी चान्नी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध फिर्याद दिली. तपास पोलीस उपनिरीक्षक रामराव राठोड यांनी केला. तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. सरकार पक्षातर्फे एकूण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. एकही साक्षीदार फितूर झाला नाही. साक्षीदार संजय देवकर, कावेरी राठोड, सुभाष जैन तसेच शवविच्छेदन करणारे डॉक्टर यांच्या साक्षी व पुरावे ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपीस दोषी ठरविले. घटनेच्या दिवशी भांडणाचा आवाज ऐकून शेजारी कावेरी राठोड व त्यांचे पती कैलास राठोड हे झोपेतून उठले. त्यांनी आरोपीच्या घराकडे धाव घेत दरवाजा उघडण्यास सांगितले; मात्र आरोपीने प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर नातेवाईक संजय देवकर यांना बोलावण्यात आले. त्यांनीही खिडकीतून आवाज देऊन दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला, परंतु आरोपीने दार उघडले नाही.

आरोपी आदर्श गोसेवा व अनुसंधान केंद्र, आलेगाव येथे कार्यरत असल्याने संस्थेचे अध्यक्ष सुभाष जैन यांनाही घटनास्थळी बोलावण्यात आले. सर्वांच्या प्रयत्नांनंतरही आरोपीने दरवाजा उघडले नाही.

# बिंदी घरसाठी जागा सोडल्यामुळे संभ्रम परवानगी नसलेले बांधकाम काढले !

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी



**अकोला:** गांधी रोडवर बिंदी घरच्या बाजूचे अतिक्रमण काढण्यात आले. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले. परंतु सहा बाय आठची जागा सोडण्यात आली. याबाबत तर्कवितर्क करण्यात आले. एवढाच तुकडा सोडण्याचे कारण काय. ती जागा अधिकृत की अनधिकृत असा प्रश्न उपस्थित झाला.

बिंदी घरचे संचालक महापालिकेच्या कारवाई विरुद्ध न्यायालयात गेले आहे. १६ फेब्रुवारी रोजी त्यावर चर्चा होईल. तसेच बिंदी घरवाल्यांच्या म्हणण्यानुसार सोडलेली जागा त्यांची आहे. त्यामुळे सहा बाय आठ चा तुकडा सोडून दिला आहे. परंतु परवानगी न घेता केलेले बांधकाम काढले.

# अकोल्यात भूमिगत गटारच्या नावाखाली रस्त्यांची दुर्दशा

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

## रस्ते एकाच वेळी खोदून ठेवल्याने समस्या वाढल्या



**अकोला:** शहरात भूमिगत गटार योजनेच्या नावाखाली मुख्य रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवल्यामुळे आणि कामाचा वेग संथ असल्यामुळे सामान्य जनतेला मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

ठिकठिकाणी रस्ते उखडलेले असल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले असून, शहरातील नागरिक आता संताप व्यक्त करत आहेत.

शहरात टप्प्याटप्प्याने काम करण्याऐवजी अनेक भागांतील मुख्य रस्ते एकाच वेळी खोदून ठेवण्यात आले आहेत. यामुळे वाहतुकीची मोठी कोंडी होत असून नागरिकांच्या अडचणीत भर पडली आहे.

रस्त्यांच्या कडेला उघड्या अवस्थेत असलेले लोखंडी सळई वाहनधारक आणि पादचाऱ्यांसाठी जीवघेण्या ठरत आहेत. रात्रीच्या वेळी येथे मोठा अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.

अनेक दिवसांपासून काही भागांत काम पूर्णपणे बंद आहे, परंतु ठेकेदार किंवा प्रशासनाकडून याबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिले जात नाहीये. या कामासाठी नक्की जबाबदार कोण, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. या रखडलेल्या कामांविरोधात काही नगरसेवकांनी आंदोलने केली, तर नागरिकांनी सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल करून प्रशासनाचा निषेध केला आहे. मात्र, अद्यापही रस्ते पूर्ववत करण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करावी आणि रखडलेली कामे पूर्ण करून अकोलेकरांना दिलासा द्यावा.

CLASSIFIED
कंपनी काम के लिय अनुभवी सेल्समन चाहिये
-:संपर्क :-
सियाराम मार्केटिंग
होमअप्लांर्स गिफ्ट आर्टिकल
चित्रा टॉकीज के पास अमरावती
हमारे यह शादी, बर्थडे एवम सभी प्रसंग के लिय ठोक भाव रिटन गिफ्ट मिलते है!
9422956859
9422733033
9657901854

नाती जपण्याचा उत्सव
व्हॅलेंटाईन डे विशेष!
'सिटी न्यूज सुपरफास्ट' चा खास उपक्रम
प्रेम कोणाचेही... व्यक्त व्हा कधीही !
प्रेमाला वय नसते आणि शब्दांना सीमा! मग ते प्रेम आई-वडिलांवरचे असो, जोडीदारावरचे असो वा मित्रावरचे ! यंदा तुमच्या आयुष्यातील त्या खास व्यक्तीसाठी दोन ओळी लिहा आणि त्यांच्यासोबतचा फोटो आम्हाला पाठवा.
तुमच्या भावनांना आम्ही देऊ 'सिटी न्यूज सुपरफास्ट'चा हक्काचा मंच!
खास आकर्षक : लकी ड्रॉ
सर्व सहभागींमधून ३ भाग्यवान विजेत्यांना मिळणार आकर्षक बक्षिसे!
सहभाग शुल्क: ₹100/- मात्र
फोटो व संदेश पाठवा: [9075012853]
अंतिम तारीख: 12 फेब्रुवारी 2026
शब्दांची ही भेट ठरेल गिफ्टपेक्षाही अनमोल!
RRC NETWORK
सिटी न्यूज सुपरफास्ट
epaper.citynewssuperfast.com
RRCDIGITALAKOLA rrc_news_akola RRC Digital

सहारा मल्टी पर्पज फाउंडेशन
डांस एकेडमी
अब डांस सीखना हुआ आसन
कोरियोग्राफी : वेडींग, बर्थडे कोरिओ, इव्हेंट्स, स्कूल अन्युअल, स्टेज शो
नृत्य शैली : बॉलीवुड, फ्री स्टाइल, हिप हॉप
अभी जुड़ें और बनें स्टार परफॉर्मर !
कोरियोग्राफर : राजेश्री शर्मा
8669090193 / 89832 00409

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK